सुविचार
जो मैं अब अनुभव कर रहा हूँ, वह अतीत का फल है, भविष्य में जो अनुभव करूँगा वह इस बात पर निर्भर करता है कि मैं अब क्या करता हूँ ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र
दैनिक यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/रविवार दि. १९ मे २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१८३ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

# हिंदूत्व सोडले आता भगव्या झेंड्याची ॲलर्जी




मुंबई : बाळासाहेबांचे विचार सोडून काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसलेल्यांनी हिंदूत्व सोडले. आता तर त्यांना शिवरायांचा भगवा झेंडा, प्रभू रामचंद्राचा भगवा आणि वारकऱ्यांच्या भगव्या झेंड्याची ॲलर्जी झालीय कारण तुमच्या प्रचार रॅलींमध्ये पाकिस्तानचे झेंडे फडकत आहेत, अशी जोरदार टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उबाठावर केली.

दक्षिण मुंबईतील महायुतीच्या उमेदवार यामिनी जाधव यांच्या प्रचार सभेत मुख्यमंत्री बोलत होते. राज्यभरात पहिल्या चार टप्प्यात महायुतीला भरभरुन प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे महायुतीचे जास्तीत जास्त खासदार निवडून येतील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

आपले सरकार येण्यापूर्वी सगळी कामे बंद होती. मेट्रो कारशेड, अटल सेतू, समृद्धी महामार्ग, मुंबईचे सौंदर्यीकरण असे अनेक प्रकल्प महायुतीने सुरु केले. दोन अडीच वर्षात मुंबईतील रस्त्यांवर एकही खड्डा दिसणार नाही, असे मुख्यमंत्री म्हणाले. यापूर्वी रस्त्यावर केवळ डांबर टाकायचे आणि त्यात पैसे खायचे. यासाठी महापालिकेचे दहा वर्षात साडेतीन हजार कोटी रुपये खर्च झाले होते. पुढील २५ - ३० वर्षात रस्त्यावर एकही खड्डा दिसणार नाही, असे मुख्यमंत्री म्हणाले. रखडलेले प्रकल्प, कोणामुळे अडकलेले प्रकल्प मार्गी लावून मुंबईबाहेर फेकलेल्या मुंबईकरांना हे सरकार परत आणणार आहे. त्यासाठी बीडीडी प्रकल्प, पोलिसांची घरे म्हाडा, एमएमआरडीए, एमएसआरडीसी, एमआयडीसीच्या माध्यमातून पुनर्विकासाचे प्रकल्प सुरु करणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. मुंबईसाठी इतके वर्ष काय केले, याचा हिशेब मुंबईकर येत्या निवडणुकीत विचारल्याशिवाय राहणार नाही, अशी टीका मुख्यमंत्र्यांनी केली. ज्या उपक्रमातून मुंबईकरांना लाभ होत असेल तर हा मुख्यमंत्री ते करायला तयार आहे, असे ते म्हणाले. पुनर्विकास रखडलेल्या ३८८ इमारतींसाठी नगर विकास विभागाला वेगळा नियम करण्याच्या सूचना दिल्याचे ते म्हणाले. ही निवडणूक देश घडवणारी निवडणूक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मागील १० वर्षात देशाला जगभरात मानसन्मान मिळवून दिला. नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करायचे आहे.

(पान २ वर)

# आम्ही भाजपच्या मुख्यालयात येतोय हिंमत असेल तर अटक करा

नवी दिल्ली : दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना थेट आव्हान दिले आहे. उद्या माझ्या अनेक बड्या नेत्यांसह मी भाजपच्या हेडक्वार्टरवर धडक देणार आहे, कोणा कोणाला तुम्हाला तुरुंगात टाकायचे आहे त्यांना टाका, असे त्यांनी जाहीर केले आहे.

केजरीवाल म्हणाले, तुम्ही पाहात आहात की मोदी आम आदमी पार्टीच्या कसे मागे पडले आहेत, ते आमच्या नेत्यांना कशा प्रकारे तुरुंगात टाकत आहेत. त्यांनी मला तुरुंगात टाकले, मनिष सिसोदिया यांना तुरुंगात टाकले, संजय सिंह, सत्येंद्र जैन यांना




तुरुंगात टाकले. आज माझ्या पीएला देखील तुरुंगात टाकले. आता ते राघव चड्ढा जे नुकतेच लंडनवरुन परतलेत त्यांनाही तुरुंगात टाकणार असल्याचे कळत आहे. मला पंतप्रधानांना विचारायचे आहे की, तुम्ही हा जेल-जेलचा खेळ खेळत आहात. त्यानुसार आमच्या एकेका व्यक्तीला तुरुंगात टाकत आहात. उद्या मी १२ वाजता आमच्या सर्व बड्या नेत्यांसह, आमदार-खासदारांसह भाजपच्या मुख्यालयात येणार आहे. ज्यांना तुम्हाला तुरुंगात टाकायचे आहे टाका, एकाच वेळी सर्वांना तुरुंगात टाका.

तुम्हाला वाटत आहे की, असे करुन तुम्ही आम आदमी पार्टीला चिरडून टाकाल पण अशा प्रकारे आम आदमी पार्टी संपणार नाही. एकदा तुम्ही सर्वांना तुरुंगात टाकून तर बघा. आम आदमी पार्टी हा विचार आहे जो संपूर्ण देशभरात लोकांच्या हृदयात पोहोचला आहे. जितक्या आपल्या नेत्यांना तुम्ही तुरुंगात टाकाल तितके शेकडो नेते हा

(पान २ वर)

## अखेर बिभव कुमार यांना अटक

नवी दिल्ली – स्वाती मालिवाल यांना झालेल्या कथित मारहाणी प्रकरणी अखेर बिभव कुमार यांना अटक करण्यात आली आहे. स्वाती मालिवाल यांच्या तक्रारीनंतर दिल्ली पोलिसांकडून ही कारवाई करण्यात आली. तत्पूर्वी गुरुवारी दिल्ली पोलिसांनी स्वाती मालिवाल यांच्या घरी जाऊन त्यांचा जबाब नोंदवला होता. तसेच त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचाही जबाब नोंदवण्यात आला होता. त्यानंतर शुक्रवारी बिभव कुमार यांच्या विरोधात गुन्हाही दाखल करण्यात होता.

या संदभार्त एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना आपच्या लीगल सेलचे प्रमुख संजीव नसियार म्हणाले, दिल्ली पोलिसांनी बिभव कुमार यांना ज्याप्रकारे अटक केली आहे, ते पूर्णपणे चुकीचं आहे. आम्हाला अद्याप गुन्हा दाखल झाल्याची अधिकृत प्रत मिळालेली नाही. त्यामुळे आज सकाळी आम्ही न्यायालयात अर्ज केला होता. या अर्जावर दुपारी चार वाजता निर्णय येणार होता. मात्र, त्यापूर्वी पोलिसांनी बिभव कुमार यांना अटक केली आहे.

दरम्यान, १३ मे रोजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या निवासस्थानी मला मारहाण करण्यात आली, असा आरोप स्वाती मालिवाल यांनी केला होता. त्यांनी अरविंद केजरीवाल यांचे स्वीय साहायक बिभव कुमार यांच्यावर गंभीर आरोप केले होते. याप्रकरणी गुरुवारी दिल्ली पोलिसांच्या पथकाने स्वाती मालिवाल यांच्या घरी जाऊन त्यांचा जबाबही नोंदवला होता. त्यावेळी स्वाती

(पान २ वर)

# १ जून ते ३१ जुलैपर्यंत मासेमारीस मनाई, नौकांना समुद्रात जाण्यास बंदी

रत्नागिरी : राज्यात अवकाळी पावसाने थैमान घातल्याचं चित्र गेल्या आठवड्यात पाहायला मिळालं. राजधानी मुंबईतही (चींलरळ) सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला. त्यावेळी, घाटकोपमध्ये महाकाय बॅनर कोसळून दुर्घटनाही घडली. तर, अद्यापही पुढील २ दिवसांसाठी अनेक जिल्ह्यात पावसाचा अलर्ट देण्यात आला आहे. आता, मान्सूनपूर्व पाऊसानंतर यंदा लवकरच मान्सूनची हजेरी लागणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. त्यामुळे, पावसाळ्याच्या दृष्टीने तयारी करण्यात येत आहे. मच्छिमारांसाठी व नौका पर्यटकांसाठी काही महत्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, १ ते ३१ जुलै या कालावधीत २ महिन्यांसाठी मासेमारी करण्यास मनाई करण्यात आली आहे.

मच्छिमारी सहकारी संस्था, त्यांचे नौकामालक, सभासद व अन्य संबंधितांना महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ व सुधारणा अध्यादेश, २०२१ अन्वये यावर्षी ०१ जून ते ३१ जुलै २०२४ (दोन्ही दिवस धरुन ६१ दिवस) या कालावधीत महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रीय जलधी क्षेत्रात यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांना मासेमारी करण्यास मनाई करण्यात आली आहे. अशी माहिती मत्स्यव्यवसाय सहायक आयुक्त अभयसिंह शिंदे इनामदार यांनी दिली आहे.

या बंदी कालावधीत सागरी कायद्याचा भंग करुन मासेमारी करणारे मच्छिमार खालील कारवाईस पात्र होतील.

१) पावसाळी मासेमारी बंदी यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांना लागू राहील.

२) पावसाळी मासेमारी बंदी ही पारंपारिक पध्दतीने मासेमारी करणाऱ्या बिगर- यंत्रचालित नौकांना लागू राहणार नाही.

३) समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या सर्व यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौका दि.

(पान २ वर)

# स्वामी प्रसाद मौर्य यांच्या मुलाचा काँग्रेसमध्ये प्रवेश

रायबरेली : लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर देशातील विविध पक्षांच्या छोट्या-मोठ्या नेत्यांनी पक्षांतराचा खेळ सुरू केला आहे. यामध्ये ज्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज भरले आहेत तेही अर्ज मागे घेऊन इतर पक्षात प्रवेश करत आहेत. असाच प्रकार स्वामी प्रसाद मौर्य यांचा मुलगा उत्कर्ष मौर्य यांनी केला असून, उत्कर्ष यांनी कुशीनगरमधून आपली उमेदवारी मागे घेतली आणि काँग्रेसमध्ये प्रवेश केला. तर काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी उत्कर्षचे पक्षात स्वागत केले.

मिळालेल्या माहितीनुसार, उत्कर्ष मौर्य यांनी मनोज पांडे यांच्या विरोधात उंचाहारमधून विधानसभा निवडणूक लढवली आहे. उत्कर्ष यांचा पक्षात



समावेश करून काँग्रेसने मनोज पांडे यांना कोंडीत पकडण्याची रणनीती सुरू केली आहे. मौर्य उंचाहार रायबरेली येथील आहेत. रायबरेलीमध्ये २० मे रोजी पाचव्या टप्प्यात मतदान होणार आहे. दोन-तीन दिवसांपूर्वी राष्ट्रीय शोषित समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि माजी मंत्री स्वामी प्रसाद मौर्य यांचे पुत्र असलेले उत्कर्ष मौर्य यांनी यूपीच्या कुशीनगर लोकसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र त्यांनी काल आपला उमेदवारी अर्ज मागे घेत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. दरम्यान सपा नेते मनोज पांडे यांनी शुक्रवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला होता. रायबरेलीमधून काँग्रेस नेते राहुल गांधी निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे भाजपने पांडेंना आपल्या पक्षात घेतले आहे. मनोज पांडे यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर मी राजकारणात असो किंवा नसू मात्र, सनातनसोबतच राहणार असे म्हटले होते. तर मनोज पांडे यांना घेरण्यासाठी काँग्रेसने उत्कर्षला आपल्या पक्षात सामिल करून घेतले आहे, असे राजकीय तज्ज्ञांचे मत आहे. स्वामी प्रसाद मौर्य आणि त्यांच्या परिवाराचे रायबरेलीत आपल्या समाजात चांगलेच वजन आहे.

# सर्वोच्च न्यायालयाचा आदेश असल्याने काँग्रेसनेहि राम मंदिर बांधलेच असते

जयपूर : काँग्रेस वारंवार सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर राम मंदिर बांधल्याचे सांगत आहे. याच दरम्यान आता राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी मोठा दावा केला आहे. केंद्रात एनडीए नसून यूपीए सरकार असते तरी राम मंदिर बांधले असते असे म्हटले आहे. अशोक गेहलोत यांनी यामागे एक मोठे कारण देखील सांगितले आहे.

अशोक गेहलोत म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी राम मंदिराबाबत लोकांमध्ये संभ्रम पसरवत आहेत आणि निवडणूक जिंकण्यासाठी ते कोणत्याही थराला जाऊ



शकतात. वृत्तसंस्थेशी बोलताना भाजपाच्या आरोपांना उत्तर देताना काँग्रेस आल्यास राम मंदिराला कोणताही धोका नाही असे म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राम मंदिर बांधले गेले आहे. त्यांना संभ्रम आहे. सरकार एनडीएचे नसते आणि यूपीएचे असते, भाजपाचे नसते आणि काँग्रेसचे असते तरीही मंदिर बांधले गेले असते कारण तो सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आहे. ते संभ्रम

(पान २ वर)

# महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार बेकायदेशीर

नवी दिल्ली : महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार बेकायदेशीरपणे स्थापन करण्यात आले असून, मोदी सरकारने देशात विश्वासघाताचे राजकारण सुरू केले आहे, असा आरोप काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केला. मोदींनी घटनात्मक संस्थेचा गैरवापर करून ब्लॅकमेल करून आणि धमकी देऊन विविध राज्यांतील विरोधी पक्षातील नेत्यांना फोडून भाजपने सत्ता स्थापन केली आहे. तोच प्रकार महाराष्ट्रात पहायला मिळाला. तर महाराष्ट्राशिवाय मोदींनी कर्नाटकमध्ये, मणिपूर, गोवा, मध्य प्रदेश, गुजरात या राज्यात देखील तोच प्रकार केला, असा गंभीर आरोपही खरगे यांनी



केला.

लोकसभा निडवणुकीच्या पाचव्या टप्प्यातील प्रचाराच्या तोफा आज थंडावतील. त्यापूर्वी इंडिया आघाडीने पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपसह महायुतीचा चांगलाच समाचार घेतला. तर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी मोदींवर निशाणा साधला. इंडिया आघाडीने मुंबईत पत्रकार परिषद घेतली. त्यात मोदींनी धमकी, आमिषं दाखवून विरोधक फोडल्याचा दावा केला. यावेळी इंडिया आघाडीचे अनेक नेते उपस्थित होते.

खरगेंनी निवडणूक आयोगावर व्यक्त केला संशय
देशात सध्या मूळ पक्ष चोरण्याचे काम सुरू असून, भाजपला पाठिंबा देणा-या लोकांना मूळ पक्षाचे नाव, चिन्ह देण्याचे प्रकार वाढले आहेत. यामुळे खरगे यांनी निवडणूक आयोग आणि न्यायपालिकेवरही संशय व्यक्त केला. या सर्व गोष्टी पंतप्रधान मोदींच्या इशा-यावर होत असल्याचा आरोप खरगे यांनी केला. देशाच्या इतिहासात कोणत्याच पंतप्रधानांनी तोडफोडीचे राजकारण केले नाही, असा दावाही खरगे यांनी केला.

# देशभरात उष्णतेची लाट; तापमान ४५ अंशांपर्यंत पोहोचणार

नवी दिल्ली : भारतीय हवामान विभागाने आज देशाच्या अनेक भागांमध्ये उष्णतेच्या तीव्र लाटेचा इशारा जारी केला आहे. एक्सवर केलेल्या ट्विटमध्ये, हवामान विभागाने म्हटले आहे की, पंजाब, हरियाणा-चंदीगड-दिल्ली, पश्चिम राजस्थान आणि पूर्व राजस्थानच्या काही भागात उष्णतेची लाट ते तीव्र उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. तर काही भागात मुसळधार पाऊस कोसळणार असल्याचाही इशारा दिला आहे.

याशिवाय, उत्तर प्रदेशातील काही भागात उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. मध्य प्रदेश, उप-हिमालयीन पश्चिम बंगाल, गंगेचे पश्चिम बंगाल, बिहार, गुजरात, सौराष्ट्र आणि कच्छ मध्येही तापमान अधिक असण्याची शक्यता आहे.

माध्यमांशी बोलताना वरिष्ठ आयएमडी शास्त्रज्ञ डॉ. नरेश कुमार म्हणाले की, एप्रिलपासून शेवटच्या काही दिवसांपर्यंत, सतत पश्चिम विक्षोभ वायव्य भारतावर प्रभाव टाकत आहे. ज्यामुळे जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडच्या काही भागांत तापमान वाढत आहे. अवकाळी पडलेल्या पावसामुळे मे महिन्यात तापमान ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे.

पंजाब आणि हरियाणामध्येही तापमान ४४ अंश सेल्सिअसच्या जवळ आहे

(पान २ वर)

# थकबाकीधारकावर मनपाची धडक कार्यवाही



लातूर/ प्रतिनिधी: मालमत्ता कर हाच लातूर महापालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत आहे. त्या दृष्टीने सालसन २०२३-२४ वर्षात मनपा तर्फे वसुली मोहिम राबविण्यात आली, ज्याअंतर्गत नागरिकांना विविध सवलती देण्यात आल्या व वेळोवेळी कर भरण्याचे आवाहन देखील करण्यात आले. त्यास बहुतांश मालमत्ताधारकांनी प्रतिसाद देऊन आपल्या कराचा भरणा करून मनपास सहकार्य केले.

परंतु, काही मालमत्ताधारकाकडे कर थकीत आहे. थकबाकिदार यांना थकीत रकमेवर दरमहा व्याज सुद्धा लागत आहे. थकीत मालमत्ताकराचा भरणा करण्याबाबत वेळोवेळी मागणी बीले,नोटीस देऊनही कराचा भरणा न केल्याने क्षेत्रीय कार्यालय ए,बी,सी,डी, अंतर्गत येणा-या कार्यक्षेत्रामध्ये थकित मालमत्ताधाकराच्या वसुलीसाठी दि.१७.०५.२०२४ रोजी एकूण १६ वाणिज्य आस्थापनावर कार्यवाही करण्यात आली. सदर मालमत्तापैकी पेट्रोल पंप कार्यालय, बॅंक व्यवस्थापक कार्यालय, लाकडी गोडाऊन तसेच इतर वाणिज्य आस्थापनावर कार्यवाही करताच यामधील ०८ मालमत्ताधारकांनी आपल्याकडील थकीत कराचा भरणा केला आहे.

या पुढेही थकीत कराच्या वसूलीसाठी थकबाकी मालमत्ताधारकांवर जप्तीची कार्यवाही करण्यात येणार असून थकबाकीधारक मालमत्ताधारकांनी आपल्याकडील थकीत मालमत्ताकर व पाणी पट्टी कराचा भरणा करून जप्तीसारखी होणारी कटू कार्यवाही टाळावी व मनपा प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांनी नागरिकांना केले आहे

# गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानात जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे : जिल्हाधिकारी



लातूर / प्रतिनिधी- तलावातील सुपीक गाळ आपल्या शेतात टाकून जमीन अधिक सुपीक बनविण्याची संधी गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानामुळे शेतकऱ्यांना मिळत आहे. तसेच तलावातील गाळ उपसला गेल्याने अधिकचा पाणीसाठा निर्माण होवून सिंचनासाठी मदत होणार असल्याने शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने या अभियानात सहभागी होवून आपल्या परिसरातील तलावातील गाळ उपसा करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.

गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानातून रेणापूर मध्यम प्रकल्पातील गाळ उपसा करण्यात येत असून या कामाची जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी पाहणी केली. औसा-रेणापूरचे उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, लघुपाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता रोहित जगताप, जिल्हा जलसंधारण अधिकारी अनिल कांबळे यांच्यासह स्थानिक शेतकरी यावेळी उपस्थित होते.

सध्या जिल्ह्यातील तलावांमधील गाळ उपसा करण्याला प्रशासनाने प्राधान्य दिले आहे. पावसाळ्यापूर्वी जास्तीत जास्त प्रकल्पांमधील गाळ उपसा करण्याचे नियोजन असून या कामामध्ये शेतकऱ्यांचा सहभाग आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी आपल्या आजूबाजूच्या तलावातील गाळ उपसा करण्यासाठी जलसंधारण विभागाकडे मागणी नोंदवावी. पावसाळ्यापूर्वी तलावातील गाळ

(पान २ वर)

# सीबीएसई दहावीच्या परिक्षेत सुनेगाव (शेंद्री) येथील शुभम जायभाये याला ९७.४० टक्के गुण



अहमदपूर / प्रतिनिधी- नुकताच सीबीएसई दहावी बोर्डाचा निकाल लागला असून अहमदपूर तालुक्यातील मुळचा सुनेगाव ( शेंद्री) या ग्रामीण भागातील विद्यार्थी शुभम पुंडलीक जायभाये हा विद्यार्थी आपल्या आई - वडीला सोबत बल्लारपूर तहसील जि चंद्रपूर देहली गावात राहत असुन तेथेच असलेल्या मॉन्टफोर्ट उच्च माध्यमिक विद्यालयाचा सीबीएसई अभ्यासक्रमाच्या दहावी परीक्षेत शाळेतून ९७.४० प्रश्नांसह प्रथम क्रमांक पटकावला असुन चंद्रपूर जिल्ह्यातुन दुसरा क्रमांक पटकावला आहे शुभमचे वडील पुंडलीक रामकिशन जायभाये हे बल्लापूर येथे वनपाल म्हणुन नौकरी करतात या यशाबद्दल सुनेगाव ( शेंद्री) शेनी ग्रामपंचायत सरपंच सौ उषा जायभाये, सामाजिक कार्यकर्ते राम जायभाये, गोपीनाथ जायभाये पत्रकार गोविंद काळे, डॉ रूपेश थगनर, माजी प्रा. शिवदास थगनर, माजी प्रा. अशोक जायभाये , श्रीकांत केंद्रे, शिवाजी काळे, मोतीराम जायभाये आदी सह गावकऱ्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा देऊन गावात पेढे वाटून फटाके फोडून आंनद उत्सव साजरा केला शुभम वर सर्व स्तरावरून कौतुकाचा वर्षाव होत असुन त्याला उच्च दर्जाच्या शिक्षणासाठी कोटा राजस्थान येथे पाठवण्यात आले आहे.

# यशवंत विद्यालयाचे ४६ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र

## पाचवीचे २६ तर आठवीचे २० विद्यार्थी गुणवत्ताधारक



अहमदपूर (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता पाचवी) आणि पूर्व माध्यमिक (इयत्ता आठवी) शिष्यवृत्ती परीक्षेत अहमदपूर येथिल यशवंत विद्यालयातील ४६ विद्यार्थ्यांने भरीव यश संपादन केले आहे.

पूर्व उच्च प्राथमिक इयत्ता पाचवीतील रमण गुणाले,अवनिश जोशी,स्वराली गडवे,केशव ढाकणे, अभय गुणाले,मुक्ताई गुडसुरकर,अराध्या पाटील,विष्णू यंचवाड,प्राप्ती गुंडरे,सानवी सुडे, सुरभी मुसळे,अनुष्का केंद्रे,नंदिनी नागरगोजे,अरशान शेख,साई केंद्रे,प्रांजल लोहारे,ओमराज पौळ,मुकुंदराज नारागुडे,शिवम क्षिरसागर,संस्कृती गिरी,श्रावणी फड,वरद नळगीरे,सिद्धी भोजराज,सार्थक भालके,समर्थ पदातुरे तर पूर्व माध्यमिक इयत्ता आठवीतील विद्यार्थी वैष्णवी फड,सतेज हंगरगे,नैतिक उगिले,अर्जून वलसे,अनुष्का इजारे,माधुरी मुंढे,अपूर्वा कराड,अक्षरा रोकडे,वर्धन नागरगोजे,मुकुंद केंद्रे,अदिती पाटील,अभिनव पागे,श्लोक पारशेट्टे,ओमकार सावरगावे,युगंधर शिंदे,आदित्य ऋतुजा ढाकणे,अनिसा पठाण,सुप्रिया मुंढे,रितेश कोटलवारहे विद्यार्थी गुणवत्ता धारक ठरले आहेत.

वरील गुणवंत विद्यार्थ्यांना इयत्ता आठवीसाठी आर जी बोराळकर,एच एम सुडे,एस डी फुलमंटे ,सौ.पी जी सोलपुरे,सौ.एम बी देशमुख,एस आर सूर्यवंशी, एस कुमरे तर इयत्ता पाचवीसाठी सौ एस झौळगीकर,व्ही एच वाडकर,बी एन कांबळे,के जी सुडे आदिचे मार्गदर्शन लाभले. वरील यशाबद्दल टागोर शिक्षण समितीचे अध्यक्ष डॉ. अशोकराव सांगवीकर,सचिव डी.बी.लोहारे गुरुजी,सहसचिव डॉं सुनिता चवळे मॅडम, प्राचार्य गजानन शिंदे,उप मुख्याध्यापक राजकुमार घोटे,पर्यवेक्षक आशोक पेद्देवाड,रामलिंग तत्तापुरे यांच्यासह शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन व कौतुक केले.

## खुरगावला आज पौर्णिमोत्सव कार्यक्रमाचे आयोजन

नांदेड - तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात ऋषिपठण बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने आज दि. १९ मे रोजी मपौर्णिमोत्सवफ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळपासूनच विविध धम्मविधी संपन्न होणार असून या कार्यक्रमाला आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम, ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रो. डॉ. भास्कर दवणे, भूतान धम्माभ्यास दौऱ्याहून परतलेले बौद्ध उपासक उपासिका तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती राहणार असल्याची माहिती अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरु संघनायक भदंत पंयाबोधी थेरो यांनी दिली.

खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात दरमहा पौर्णिमेचे औचित्य साधून प्रत्येक महिन्याच्या १९ तारखेला पौर्णिमोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यात परित्राणपाठ, सूत्तपठण, गाथापठण, त्रिसरण पंचशील, अष्टशील, दसशील ग्रहण, त्रिरत्न वंदना, ध्यानसाधना, ध्वजारोहण, बोधीपूजा, धम्मदेसना, आर्थिक दान, फलदान, भिक्खू संघास आणि उपासकांना भोजनदान, बुद्ध भीम गीतांचा कार्यक्रम आदी कार्यक्रम होणार आहेत. डॉ. भास्कर दवणे यांच्या मातोश्रींच्या स्मरणार्थ भिक्खू संघास व सर्व उपस्थितांना भोजनदान देण्यात येणार आहे. तसेच भूतान धम्माभ्यास दौऱ्याहून परतलेल्या उपासकांचा भव्य सत्कार करण्यात येणार आहे. कार्यक्रमास हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

या उपासक उपासिकांचा होणार सत्कार कार्यक्रमाच्या दरम्यान भूतान धम्माभ्यास दौऱ्याहून परतलेल्या उपासक उपासिकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. या दहा दिवसांच्या दौऱ्यात भदंत पंयाबोधी थेरो यांच्यासह राजेंद्रकुमार टोके, पद्मीन सदावर्ते, शारदा थोरात, सुप्रिया पेडगांवकर, सुमन पंडित, नागोराव कोकाटे, शिला कोकाटे, कल्पना घोगडे, चंद्रकांत पंडित, वंदना पंडित, राजश्री सूर्यतळ, शिवगंगा वाटोडे, बापुराव वाटोडे, कमल सूर्यतळ, गोविंद सूर्यतळ, ज्ञानेश्वर घोडगे, नाथा पंडित हे बौद्ध उपासक उपासिका सहभागी झाले होते.

# दहावीच्या १९९६ ची वर्गमित्रांचा २८ वर्षानंतर माजी विद्यार्थी स्नेह मेळावा संपन्न

## विदेशातील मित्रांनेही स्नेह मेळाव्यात ऑनलाईन नोंदवला सहभाग

अहमदपूर (प्रतिनिधी)- यशवंत विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांने मित्र मैत्रिणींनीसह २७ वर्षानंतर एकत्रित येऊन शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देऊन मोठ्या उत्साहाने व मोठ्या संख्येने माजी विद्यार्थ्यांना स्नेह मेळावा पार पाडला.

शहरातील प्रसाद मंगल कार्यालयात १९९६ मध्ये यशवंत विद्यालयात दहावीचे शिक्षण घेतलेल्या वर्गमित्रांची २७ वर्षानंतर भेट झाली. यावेळी आयोजित मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी यशवंत विद्यालयाचे मुख्याध्यापक गजानन शिंदे हे होते.

यावेळी माजी विद्यार्थ्यांना शिकवलेल्या एस. एस.भातांब्रे,कलावती भातांब्रे, ए.एन.कोंडापूरे, बी. एम. दहिटणकर,पंढरीनाथ बिलापट्टे, एस. व्हि. होनराव, शिवानंद भेटे, शकुंतला यणगे, व्ही.आर. साबळे, एम. आर. पाटील, बालाजी कोटलवार, विश्वनाथ पगडले,एम.एल. कांबळे, करंजकर, बी.सी. स्वामी, सतीश होनराव, इ. झेड, गोंटे, बालाजी लांडगे,राजेंद्र सूर्यवंशी या गुरुजनांचा सन्मान करण्यात आला.

वर्गमित्रांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. यावेळी वर्गमित्रांनी व्यासपीठावर जाऊन एकमेकांचा परिचय दिला. यावेळी गीतगायन, कविता, भाषण आदी विविध कला गुणदर्शनपर कार्यक्रम सादर करण्यात आला. मेळाव्यात ८० वर्गमित्र सहभागी झाले. त्यात तहसीलदार गोविंद यरमे,डॉ. प्रवीण सांगवीकर,डॉ.मंगेश कांगणे,संतोष मद्देवाड,स्वप्नील व्हत्ते,प्रदीप गुंडाळे,सचिन पाटील,सुनिता मोरे,मोनिका जाजू,मिनाक्षी ढेले,श्रद्धा दुबे यांची उपस्थिती होती.

खरे तर वयाच्या १५-१६ व्या वर्षी विखुरलेले सर्वजण आज चाळीशी पार झाल्यानंतरच एकत्र भेटणे.सुमारे २७ वर्षानंतर भेटलेले मित्र त्यांच्या आठवणी उजाळा देत गेट टुगेदर साजरा केला. यावेळी आपण सर्वांनी एकत्रितपणे काहीतरी समाजोपयोगी कार्य करावेत असे स्नेह सोहळ्यात गुरुजणांनी सल्ला दिला.एकत्रितपणे स्नेह भोजनाचा आस्वाद घेण्यात आला.भोजनानंतर फोटोसेशन आटोपलं लगेच सगळ्यांची निघायची गडबड सुरु झाली.

सर्वांनाच घरी जायची घाई होती.पण कुणाचाही पाय निघत नव्हता.रेंगाळणारे जड पावले गाड्यांमधे परतत होती.डोळे भरुन जड पावलांनी सभागृह सोडून एकमेकांना निरोप दिला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिपक वलसे ,संतोष पाटील,अमित रेड्डी,विलास शेट्टे,रणजीत चौधरी,चद्रशेखर भालेराव,अमोल मेनकुदळे व सचिन खानापूरे या मित्रांनी परिश्रम घेतले.

# लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिपचे तिसऱ्या पर्वाला दिमाखदार सुरुवात

## स्पर्धेत ३०० संघ, पाच हजारांपेक्षा अधिक खेळाडू सहभागी

लातूर (प्रतिनिधी) - ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांच्या पुढाकाराने सुरु करण्यात आलेल्या लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिप : ग्रामीण- टी १० च्या तिस-या पर्वाला शनिवारपासून (दि.१८) दिमाखदार सुरुवात झाली असून तालुकास्तरीय स्पर्धेत लातूर जिल्हा व लोहा-कंधार (जि. नांदेड) तालुक्यातील सुमारे ३०० पेक्षा अधिक संघ सहभागी झाले आहेत. उत्साही वातावरणात सुरू झालेल्या तालुकास्तरीय स्पर्धेत आता कोण बाजी मारणार, याची उत्सुकता आहे.

लोकनेते, माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या जयंतीचे औचित्य साधून लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिप संयोजन समितीच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून दि. १८ मे ते दि. २१ मे दरम्यान तालुकास्तरीय आणि दि. २२ मे ते दि. २४ मे दरम्यान




जिल्हास्तरीय सामने होणार आहेत.

तालुकास्तरीय स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून यात आजपर्यंत लातूर तालुक्यातील ४२, लातूर शहर ३२, उदगीर ४१, अहमदपूर १५, चाकूर २२, देवणी २०, जळकोट १८, रेणापूर २३, शिरुर अनंतपाळ २६, औसा ३२, निलंगा १४ तर लोहा - कंधार तालुक्यातील १३ असे जवळपास ३०० संघ व पाच हजारांपेक्षा अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवून स्पर्धेत मोठी चूरस निर्माण केली आहे.

तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या संघास ५१ हजार रुपयांचे पारितोषिक दिले जाणार असून या संघाला जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. तसेच तालुकास्तरावर उपविजेता ठरणा-या संघास ३१ हजार रुपयांचे पारितोषिक दिले जाणार आहे.

तरुण पिढीला मैदानी खेळांकडे वळवून चांगले खेळाडू घडविण्यासाठी मलोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिप : ग्रामीण- टी १० ही स्पर्धा घेण्यात येत असून या स्पर्धेच्या तिस-या पर्वालाही क्रिकेटप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडूंसाठी पोषक वातावरण तयार करुन क्रीडा संस्कृती रुजविणे आणि तिचा विस्तार करणे, हा आमचा प्रयत्न आहे असे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी सांगितले.

पान १ वरून

### हिंदूत्व सोडले...

यासाठी यामिनी जाधव यांना निवडून द्यायचे आहे. आपल्या सरकारमध्ये भेदभाव नाही. हिंदू असो वा देशभक्त मुसलमान सर्वांना समान वागणूक दिली जाते. मात्र उबाठाच्या मिरवणुकीत पाकिस्तानचे झेंडे फडकतात. त्यांच्या रॅलीमध्ये मुंबई बॉम्बस्फोटीतील आरोपी इक्बाल मुसा फिरतो. याकूब मेनन यांच्या कबरीचे उदात्तीकरण होतेय. मुंबई हल्लयातील शहिद पोलीसांचा अपमान केला, अशा ढोंगी लोकांना निवडणुकीत जागा दाखवा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

### आम्ही...

देश तयार करेल, असे केजरीवाल यांनी म्हटले आहे.

मी विचार करतोय की हे आम्हाला तुरुंगात का टाकत आहेत, आमची चूक काय आहे. आमची चूक ही आहे का की आम्ही दिल्लीतील गरिबांच्या मुलांसाठी चांगल्या शिक्षणाची सोय केली, त्यासाठी चांगल्या सरकारी शाळा तयार केल्या. हे बनवू शकत नाहीत, त्यामुळे आमची काम हे थांबवू पाहात आहेत. आम्ही दिल्लीत मोहल्ला क्लिनिक बनवलेत, चांगल्या मोफत उपचारांची सोय केली, ते हे करु शकत नाही. दिल्लीतील २४ तास मोफत सुरु असणारी वीज यांना बंद करायची आहे, हीच आमची चूक आहे. यासाठीच ते आम्हाला तुरुंगात टाकत आहेत, अशा शब्दांत केजरीवाल यांनी मोदींवर जोरदार टीकास्त्रही सोडले.

### १ जून ते...

०१ जून २०२४ पूर्वी मासेमारी बंदरात परतणे बंधनकारक आहे. तसेच दि. ३१ जुलै २०२४ वा त्यापुर्वी सदर नौकांना समुद्रात मासेमारीकरीता जाता येणार नाही.

४) राज्याच्या सागरी जलधी क्षेत्राबाहेर (सागरी किनाऱ्यापासून १२ सागरी मैलापुढे) खोल समुद्रात मासेमारीस जाणाऱ्या नौकांस केंद्र शासनाच्या खोल समुद्रातील मासेमारीबाबतचे धोरण / मार्गदर्शक सुचना/ आदेश लागु राहतील.

५) राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात (सागरी किनाऱ्यापासुन १२ सागरी मैलापर्यंत) यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौका पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत मासेमारी करतांना आढळल्यास / केल्यास महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा), २०२१ च्या कलम १४ अन्वये नौका व नौकेवर बसविलेली उपसाधने व मासेमारी सामुग्री आणि त्यामध्ये सापडलेली मासळी जप्त करण्यात येईल तसेच कलम १७ मधील तरतुदी अन्वये जास्तीत जास्त कठोर शास्ती लादण्यात येईल.

६) पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत मासेमारी करतांना यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकेस अपघात झाल्यास अशा नौकेस शासनाकडून कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मिळणार नाही.

७) बंदी कालावधीमध्ये राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात मासेमारी नौकास अवागमन निषिध्द आहे.

### अखेर बिभव...

मालिवाल यांनी घडलेल्या घटनेची संपूर्ण माहिती दिली होती. तत्पूर्वी राष्ट्रीय महिला आयोगाने बिभव कुमार यांना समन्स बजावले होते. यानुसार बिभव कुमार यांना १७ मे रोजी सकाळी ११ वाजता हजर राहण्याचे आदेश दिले होते. तसेच दिल्ली पोलिसांनी बिभव कुमार यांच्या विरोधात गुन्हाही दाखल केला होता.

या प्रकरणावर आम आदमी पक्षाचे नेते संजय सिंह यांनी एका पत्रकार परिषदेत पक्षाची भूमिका स्पष्ट केली होती. ही घटना अत्यंत निंदनीय आहे. अरविंद केजरीवाल यांना भेटायला स्वाती मालिवाल गेल्या होत्या. त्या जेव्हा केजरीवाल यांची वाट बघत होत्या तेव्हा बिभव कुमार यांनी त्यांच्याशी गैरव्यवहार केला आणि कथित मारहाणही केली. या सगळ्या घटनेनंतर आता स्वाती मालिवाल यांनी दिल्ली पोलिसांना या प्रकरणात लेखी तक्रार दिली आहे. दिल्ली पोलिसांचं पथक स्वाती मालिवाल यांच्या घरी गेलं होतं तिथे त्यांचा जबाब नोंदवण्यात आला. असे ते म्हणाले होते.

### सर्वोच्च न्यायालयाचा...

पसरवत आहेत. मोदीजी खोटे बोलतात. निवडणूक जिंकण्यासाठी पंतप्रधान मोदी कोणत्याही थराला जाऊ शकतात हे जनतेला समजले आहे असे अशोक गेहलोत यांनी म्हटले आहे.

राजस्थानमध्ये २५ जागांसाठी १९ एप्रिल आणि २६ एप्रिलला दोन टप्प्यात मतदान झाले. मतदान संपल्यानंतर भाजपा आणि काँग्रेसचे राजस्थानचे नेते आता इतर राज्यांतील आपल्या पक्षाच्या नेत्यांचा प्रचार करत आहेत. याच दरम्यान अशोक गेहलोत हे सध्या उत्तर प्रदेशातील अमेठीला भेट देत असून काँग्रेस उमेदवाराच्या समर्थनार्थ जाहीर सभेला संबोधित करत आहेत. भाजपा खासदार आणि केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांच्या विरोधात काँग्रेसने किशोरीलाल शर्मा यांना उमेदवारी दिली आहे.

### देशभरात...

आणि उष्णतेच्या लाटेची स्थिती उत्तर प्रदेशसारखीच आहे. राजस्थान, पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशमध्ये पुढील ५ दिवस आणि मध्यभागी उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये ४ दिवस, त्यानंतर हलके गडगडाटी वादळे येऊ शकतात, ज्यामुळे तापमान किंचित खाली येऊ शकते, असेही कुमार यांनी नमूद केले आहे.

याशिवाय, पुढील ५ दिवसांत तामिळनाडू, केरळ आणि दक्षिण कर्नाटकमध्ये मुसळधार ते अतिवृष्टीची शक्यता आहे. हवामान खात्याने म्हटले आहे की, पुढील ५ दिवसांत उत्तर-पश्रि्चम भारत आणि बिहारच्या मैदानी भागात उष्णतेपासून तीव्र उष्णतेच्या लाटेची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे आणि १८ मे पासून पूर्व आणि मध्य भारतात उष्णतेची लाट सुरू होण्याची शक्यता आहे.

हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार, २३ मे पर्यंत दक्षिण द्वीपकल्पीय भारतावर एकाकी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे.

### गाळमुक्त धरण...

उपसा झाल्यास तलावाच्या साठवण क्षमतेत वाढ होणार असून त्या पाण्याचा शेतीसाठी लाभ होईल, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या.

रेणापूर मध्यम प्रकल्पातून आजूबाजूच्या ७ ते ८ गावातील शेतकऱ्यांनी लोकसहभागातून गाळ उपसा सुरु केला आहे. आतापर्यंत सुमारे २ लाख २० घनमीटर गाळ उपसा करण्यात आला आहे. या तलावातील जास्तीत जास्त गाळ उपसा करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

काटगाव येथे जलयुक्त शिवार अभियानाच्या कामाला भेट

लातूर तालुक्यातील काटगाव येथे जलयुक्त शिवार अभियानातून करण्यात आलेल्या नाला खोलीकरण व रुंदीकरण कामाला जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी भेट देवून पाहणी केली. याठिकाणी जवळपास ४ किलोमीटर लांबीच्या नाल्याचे रुंदीकरण व खोलीकरण करण्यात आले असून नाल्यातील अंदाजे ३८ हजार घनमीटर गाळ उपसण्यात आला आहे. त्यामुळे ३८० सहस्त्र घनमीटर अतिरिक्त पाणीसाठा होवून या पाण्याचा फायदा आजूबाजूच्या ५०-६० विहिरी, विंधन विहिरींना होणार आहे.

ग्रामपंचायत, तसेच स्वयंसेवी संस्थांनी या नाल्याच्या दोन्ही बाजूला मृद व जलसंधारणासाठी वृक्ष लागवड करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केले. लघुपाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता रोहित जगताप, जिल्हा जलसंधारण अधिकारी अनिल कांबळे, नायब तहसीलदार गणेश सरोदे, महादेव गोमारे यांच्यासह स्थानिक शेतकरी यावेळी उपस्थित होते. टाकळी येथे आर्ट ऑफ लिव्हिंगमार्फत करण्यात आलेल्या वृक्ष लागवडीचीही जिल्हाधिकारी यांनी पाहणी केली.

# भाजपला आता आरएसएस नकोय, ज्या शिडीने वर आले तीच सोडायला तयार; प्रकाश आंबेडकरांचा टोला

नाशिक,१८- भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी भाजपला एकेकाळी संघाची गरज लागत होती. पण, आता सक्षम असल्यानं आम्ही आमचा पक्ष चालवतो, असे वक्तव्य केले. यावरून आता राजकारण तापले आहे. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी यावरून भाजपवर निशाणा साधला आहे.

जे पी नड्डा यांनी एका वृत्तपत्राला मुलाखत दिली. यात त्यांना माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्यापासून ते आतापर्यत आरएसएसची उपस्थिती कशी बदलली? असा प्रश्न विचारण्यात आला. यावर जे पी नड्डा म्हणाले की, सुरुवातीला आम्ही अक्षम असू, थोडे कमी असू. आरएसएसची गरज लागायची. पण आज सक्षम आहोत. त्यामुळे भाजप पक्ष आम्ही आमचा चालवतो, असे त्यांनी म्हटले.

भारतीय जनता पक्षाला आता आरएसएस नकोय

यावर प्रकाश आंबेडकर म्हणाले की, चांगली गोष्ट आहे. ज्या शिडीने वर आले आता तीच शिडी सोडायला तयार आहेत. मी मोहन भागवतांना विचारले होते की, मागच्या दोन वर्षात मोदींनी भेटायला वेळ दिली का? याचे उत्तर मला अजूनही आलेलं नाही. जे पी नड्डा यांच्या वक्तव्यावरून सर्व दिसत आहे. भारतीय जनता पक्षाला आता आरएसएस नकोय, आता टोला त्यांनी लगावला.

उद्धव ठाकरेंचा दिखावा

इंडिया आघाडीच्या पत्रकार परिषदेत शिवसेना ठाकरे गटाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपवर जोरदार टीका केली. पाकिस्तानचा मुद्दा काढला जात आहे. तोडा फोडा राज्य करा असा यांचं चालू आहे. मोदींना अजूनही नवाज शरीफ यांच्या केकची चव आठवत असेल, असे त्यांनी म्हटले. यावर प्रकाश आंबेडकरांना विचारले असता ते म्हणाले की, मला त्यांच्यावर टीका करायची नाही. त्यांना मुस्लिमांनी प्रश्न विचारला होता लोकसभा संपल्यानंतर भाजपसोबत समझोता करणार की नाही करणार? त्याचे उत्तर न देता ते मोदींवर टीका करत आहेत हा दिखावा आहे, असे त्यांनी म्हटले.

दोन भावंडांमध्ये लॉयल्टीची रेस

सध्या असली शिवसेना आणि नकली शिवसेना यावरून सध्या महाराष्ट्राचे राजकारण चांगलेच तापले आहे. यावर प्रकाश आंबेडकर म्हणाले की, उद्या एकनाथ शिंदेंकडे जी शिवसेना आहे तिचे प्रमुख राज ठाकरे झाले तर आश्चर्य व्यक्त करू नये. नरेंद्र मोदी आणि बीजेपी यांनी दोन भावंडांमध्ये रेस लावलेली आहे. लॉयल्टीची रेस लावलेली आहे. मोदी म्हणालेत गरज पडली तर उद्धवजींना सर्वतोपरी मदत करेल आणि दुसरीकडे राज ठाकरे यांना प्रचाराला येण्यासाठी मजबूर करणे. दोन भावंडांमध्ये अधिक लॉयल्टी कोणाकडे यामध्ये चुरस लावलेली आहे. लोकसभा निवडणुकीनंतर दोघेही भाजपसोबत असतील, अशी परिस्थिती दिसत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# मी देशभक्त आहे, अंधभक्त नाही; उद्धव ठाकरेचे फडणवीसांना प्रत्युत्तर, राज ठाकरेंवरही घणाघात

मुंबई, - पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या उपस्थितीत महायुतीची मुंबईतील शिवाजी पार्क मैदानावर जाहीर सभा झाली. या सभेच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज ठाकरे प्रथमच एकत्र आल्याचं पाहायला मिळालं. आपल्या भाषणातून राज यांनी मोदींचं कौतुक केलं, तर महाराष्ट्रासाठी काही अपेक्षाही व्यक्त केल्या आहेत. दुसरीकडे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही भाषणातून उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला. तर, मोदींनी मुंबईतील सभेतून पुन्हा एकदा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंवर नकली शिवसेना म्हणत हल्लाबोल केला. तसेच, या शिवाजी पार्कवर बाळासाहेबांचा आवाज घुमत होता, अशी आठणही मोदींनी काढली. दरम्यान, आता उद्धव ठाकरेंनी दादर येथील सभेतून राज ठाकरेंवर निशाणा साधला आहे. तर, फडणवीसांवर पलटवार करत भाजपा समर्थकांना डिवचलं आहे.

महाविकास आघाडीचे दक्षिण मध्य मुंबई लोकसभेचे उमेदवार अनिल देसाई यांच्या प्रचारार्थ दादरम ध्ये उद्धवसाहेब ठाकरेंची जाहीर सभा झाली. या सभेतून ठाकरेंनी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजप महायुती सरकावर हल्लाबोल केला. भाषणाच्या सुरुवातीलाच देवेंद्र फडणवीस यांच्या सभेतील टीकेवरुन उद्धव ठाकरेंनी पलटवार केला. हल्ली मी काहीही बोललो तरी अर्थाचा अनर्थ केला जातोय. मी माझ्या भाषणाची सुरुवात कशी करतो, यावरून देवेंद्र फडणवीस काल बोलले. अहो, मी भाजपला लाथ घातली आहे, हिंदुत्व कसे सोडेन. सध्या माझ्या देशभक्तीवर प्रश्न उपस्थित केला जातोय. पण, मी देशभक्त आहे, मी अंधभक्त नाही, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी फडणवीसांना प्रत्युत्तर दिलं.

वापरा आणि फेकून द्या, हे भाजपचे नवे धोरण आहे. नकली सेना, नकली पुत्र म्हणतायेत. काही दिवसांनी मोदी हे, नकली आरएसएस असेही म्हणतील. आज एका वृत्तपत्रात बातमी ही आली आहे, आता भाजपला आरएसएस ची गरज नाही. याचा अर्थ आता संघाला धोका आहे. सोळावं वरीस धोक्याचं तसं संघाला शंभर वरीस धोक्याचे होणार आहे, असे म्हणत जेपी नड्डा यांच्या विधानावरुन ठाकरेंनी भाजपला लक्ष्य केले.

राज ठाकरेंवर घणाघात इधर से, उधर से कल शिवाजी पार्क पर लेकर आये थे, सगळे भाडोत्री होते असे म्हणत राज ठाकरेंवरही नाव न घेता हल्लाबोल केला. ठाकरे नावाचा एक माणूस त्यांना पाहिजे होता, मग तोही त्यांनी भाडोत्री घेतलाय. आता नको काय बोलायला, आत्ताच उठले असतील, सुपारी चघळत बसले असतील, अशा सुपारी बहद्दरांवर नको बोलायला, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी राज ठाकरेंवर घणाघाती टीका केली.

रोड शो वरुन टीका

मोदी मुंबईला भिकारी करू पहात आहेत. घाटकोपर मध्ये रोड शो झाला, तो हिणकस होता. आशिया खंडातील महाकाय होर्डिंग कोसळलं. त्यात नेमके किती मृत्यू झाले, हा खरा आकडा समोर नाही. त्याच्याच बाजूला फुलांची उधळण करून, मोदींचा रोड शो काढण्यात आला, कशासाठी?, सांत्वन करायला केलं का हे? असा सवालही उद्धव ठाकरेंनी विचारला. तसेच, या रॅलीसाठी मुंबई पालिकेने खर्च केल्याचेही त्यांनी सांगितले. अनिल देसाईंचे राज्यसभेतील व्हिडीओ तुम्ही पाहिले असतील आणि समोरच्या उमेदवाराचेही व्हिडीओ तुमच्याकडे आले असतीलच. तो कोणासारखा आहे? रेवंडासारखा उमेदवार आहे? काय म्हणाले, रेवंडा सारखा? आता तुम्हीच हे सांगताय. मग सांगा तुम्हाला रेवंडा पाहिजे की अनिल देसाई सारखा, असा प्रश्न उपस्थित जनतेला ठाकरेंनी विचारला होता. दरम्यान, मोदी आणि शाह यांना निवांत झोप लागो या शुभेच्छा देतो. त्यांना आपण इंडिया आघाडीच्या पंतप्रधान पदाच्या शपथविधीला बोलावणार आहोत, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी दादरम धील भाषणाची सांगता केली.

# यशवंत धाराशिव जिल्हा

रविवार दि. १९ मे २०२४

३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com


## तायक्कांदोच्या उत्कृष्ट तरुण मुलांची प्रशिक्षणासाठी निवड होणार

धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) - बॉईज स्पोर्ट्स कंपनी, आर्टिलरी सेंटर, नाशिक रोड कॅम्प हा स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडिया आणि भारतीय लष्कर यांच्यातील संयुक्त उपक्रम आहे. बॉईज स्पोर्ट्स कंपनी, आर्टिलरी सेंटर, नाशिक रोड कॅम्प येथे १७ ते १९ मे या कालावधीत साधारण आणि सिद्ध खेळाडूंना स्पोर्ट्स कॅडेट म्हणून समाविष्ट करण्यासाठी प्रेरणा रॅली काढणार आहे. तायक्कांदो क्रीडा शाखेतील उत्कृष्ट तरुण मुलांची बॉईज स्पोर्ट्स कंपनी, आर्टिलरी सेंटर, नाशिक रोड कॅम्पमध्ये प्रशिक्षणासाठी निवड केली जाईल. क्रीडा शाखेतील निवड चाचण्या, शारीरिक आणि तांत्रिक कौशल्य चाचणी भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या प्रशिक्षक आणि अधिकारी मंडळाच्या अंतर्गत घेतली जाईल. संरक्षण मंत्रालय (लष्कर), भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या एकात्मिक मुख्यालयाने मंजूर करेपर्यंत ही निवड तात्पुरती राहील.

अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर निवडलेल्या कॅन्डेटसना बोलावले जाईल. खेळाडूंना काही समस्या किंवा शंका असल्यास ऑफिसर कमांडिग, आर्मी बॉईज स्पोर्ट्स कंपनी, आर्टिलरी सेंटर, नाशिक रोड कॅम्प- पिन - ९०८८००, भ्रमणध्वनी क्रमांक - ७००५०५३८८२ येथे संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद तुंगार यांनी केले आहे.

# फोन पे व आरटीजीएसद्वारे साडेसात लाखाला लावला चुना !

### जिल्हा कोषागार कार्यालयातील कनिष्ठ लिपिक सरनाईक यांना पार्ट टाइम जॉबची ऑफर नडली

## शासकीय नोकरीमध्ये असताना झाले नाही समाधान !

धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) - वेगवेगळी प्रलोभने व आमिषे दाखवून ऑनलाईन पद्धतीने फोन पे आरटीजीएस व वेगवेगळ्या ॲप्सद्वारे फसवणूक करण्याचे प्रकर संपूर्ण जगभरात मोठ्या प्रमाणात घडत आहेत. या माध्यमातून फसवणूक करणारी मंडळी अतिशय तज्ञ असून फसणारी मंडळी देखील बऱ्यापैकी उच्च पदावर कार्यरत असलेली व शासकीय कर्मचारी तसेच झटपट श्रीमंत होण्याची दिवास्वपणे पाहणाऱ्या मंडळीचा भरणा असल्याचे दिसून येत आहे. अशा प्रकारची फसगत धाराशिव जिल्हा कोषागार कार्यालयात कार्यरत असलेल्या कनिष्ठ लिपिकाच्या बाबतीत झालेली आहे. त्यांना शासकीय परमनंट नोकरी व गलेलठ्ठ पगार असताना देखील ते पार्ट टाइम जॉबच्या शोधात होतेच. त्यासाठी त्यांनी पार्ट टाइम जॉब मिळवून देतो असे सांगणाऱ्या भुलभुलयापैकी एकास संपर्क साधला.




फसविण्यात पटाईत असलेल्या त्या महाभागांनी प्रथम संबंधितांना विश्र्वासात घेत त्यांना आपल्या जाळ्यात ओढले. त्यांनी फोन पे, आरटीजीएस व वेगवेगळ्या ॲप्सद्वारे कनिष्ठ लिपिकाला चक्क साडेसात लाख रुपयांना गुंगवून चांगला चुना लावून त्यांच्या पार्ट टाईम जॉब करण्याच्या मनसुब्यांना फसवेगिरीचा सुरुंग लावून कंगाल करीत आपल्या शासकीय नोकरीत असंतोष म्हणजेच इतर कामाच्या भानगडीत न पडता फक्त कामावरच लक्ष देण्याचा जबरदस्त संदेश दिला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील गिरगाव येथील रहिवासी व ह.मु. बी ॲण्ड सी क्वॉर्टर कोहीनूर हॉटेलच्या पाठीमागे आनंदनगर धाराशिव येथे राहणाऱ्या तसेच सध्या धाराशिव जिल्हा कोषागार कार्यालयात कनिष्ठ लेखापाल म्हणून कार्यरत असलेल्या ३५ वर्षीय संतोष केरबा सरनाईक यांना अनोळखी मोबाईल नंबर ९००७२२५१७१ चाधारक, एस.बी.आय. बँक खाते, क्रमांक ४२९०३२७६२४५ चा धारक, इनडुसलॅन्ड बँक खाते क्र २०१०२९६८१७००, यश बँक खाते क्र ०७०१६३४००००१६३७ (IFSC code YESB0000७०१) चा धारक, एस.बी.आय. बँक खाते क्र ४२९०५०९१८६३ चा धारक, एस.बी.आय. खाते क्र ४२८९८५५८९७० चा धारक व एस.बी.आय. खाते क्र. ४२९२६८६०९९५ चा धारक यांनी दि. ७ मे रोजी रोजी १०.३७ ते दि. १४ मे रोजी ६.३५ वाजण्याच्या सुमारास कार्यालय व घरी ऑनलाईन पध्दतीने पार्ट टाईम जॉबची ऑफर देवून टेलीग्राम ॲपवर लिंक पाठवून त्यामध्ये माहिती भरण्यास सांगून वेगवेगळ्या प्रकारचे टेलीग्राम ॲपवरील टास्क देवून पैसे भरण्यास सांगितल्याने फिर्यादीने नमूद आरोपीचे बँक खात्यावर एकूण ७ लाख ४९ हजार ६७९ रुपये फोन पे व आरटीजीएसद्वारे पाठवले व टास्क पूर्ण करुन जास्त पैसे मिळवण्याचे आमिष दाखवून नमूद रक्कम भरण्यास सांगून फिर्यादीने सदरची रक्कम परत मिळण्यासाठी मोबाईल फोन व मेसेजद्वारे विचारणा केली असता नमूद आरोपींनी तुला काय करायचे ते करुन घे ? असे म्हणून सरनाईक यांनी भरलेले पैसे परत न देता त्यांची फसवणूक केली आहे. या प्रकरणी संतोष सरनाईक यांनी दि.१७ मे रोजी दिलेल्या तक्रारीवरून सायबर पोलीस ठाण्यात ४२०, भा.दं.वि.सं. सह ६६ सी, ६६ डी माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००८ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### झोपलेल्या महिलेवर सामुहिक अत्याचार

धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) - एक महिला तिच्या शेतातील घरात झोपली असताना दोन तरुणांनी तिच्या तोंडात रुमाल कोंबून लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे.

या प्रकरणी लैंगिक अत्याचारासह ॲट्रॉसिटी कायद्यान्वये संबंधितांच्या विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, १५ मे रोजी एका गावातील ३५ वर्षीय महिला तिच्या शेतातील राहत्या घरी झोपली असता १२ वाजण्याच्या सुमारास गावातील दोन तरुणांनी तिच्या तोंडात रुमाल घालून तिला गायीच्या गोठ्यात नेवून संगणमत करुन तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. तसेच तिचा मुलगा तिला सोडवण्यासाठी आला असता त्या दोन तरुणांनी तिला व तिच्या मुलास जातीवाचक शिवीगाळ केली. या प्रकरणी पिडीतीने दि. १७ मे रोजी दिलेल्या तक्रारीवरून संबंधित पोलीस ठाण्यात भा.दं. वि.सं. कलम ३७६, ३७६ (डी) सह अ.जा.ज.अ.प्र. कायदा कलम ३(१) (डब्ल्यू) (१) (ळळ), ३(२) (व्ही) अन्वये गुन्हा नोंदविला असून पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# विविध ठिकाणी चोरट्यांनी धुमाकूळ घालीत लाखोंची केली लूट

धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) - जिल्हाभरात चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. त्यांनी पेट्रोल पंपावरील रोख रक्कम, कुलूप बंद असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेतील टीव्ही संच व मोटारसायकल चोरुन लाखोंचा मुद्देमाल चोरून पसार झाले आहेत.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, वारदवाडी फाटा येथील परशुराम पेट्रोल पंप येथील सेल्स रुमचे पाठीमागील दरवाज्याचे कुलूप अज्ञात व्यक्तीने तोडून आत प्रवेश करुन कपाटामध्ये असलेली रोख रक्कम ६७ हजार ८२० रुपये चोरुन नेली. या प्रकरणी पेट्रोल पंपचा मॅनेजर मनोज कुंडलीक अंधारे (वय ४४ वर्षे) रा. माणकेश्र्वर ता. भूम यांनी दि.१७ मे रोजी दिलेल्या तक्रारीवरून परंडा पोलीस ठाण्यात ४५७, ३८० भा.दं.वि.सं. अन्वये गुन्हा नोंदवला आहे. तर धाराशिव तालुक्यातील घाटंग्री येथील जिल्हा परिषद शाळेचे दि.१६ मे रोजी ९.४० ते १७ मे रोजीच्या ८.४० वाजण्याच्या सुमारास कुलूप अज्ञात व्यक्तीने तोडून आत प्रवेश करून १ लाख २ हजार रुपये किंमतीचे एस.आर कंपनीचे दोन टी. व्ही. व मॉनिटर चोरुन नेले. या प्रकरणी धाराशिव येथील समर्थ नगरमध्ये राहणारे मुख्याध्यापक विद्यानंद गोपाळराव पाटील, (वय ५७ वर्षे) यांनी दि.१७ मे रोजी दिलेल्या तक्रारीवरून धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात ४५४, ४५७, ३८० भा.दं.वि.सं. अन्वये गुन्हा नोंदविला आहे. तसेच



भूम तालुक्यातील अंजनसोंडा येथील गोपाल मदन कारकर, (वय ३८ वर्षे) यांचे अंजनसोंडा शिवारात शेत गट नं ८४ मधील व इतर ७ लोकांच्या शेतातील ७९ स्पर्सीक्लअरचे पाईप, १५ नौजल असा एकुण ९४ हजार रुपये किंमतीचे साहित्य दि. १४ मे रोजी ९ ते दि. १५ मे रोजी ८ वाजण्याच्या सुमारास संशयीत आरोपी बाळासाहेब हणुमंत मोटे, (वय ५२ वर्षे), यश बाळासाहेब मोटे, (वय १८ वर्षे), रा. अंजनसोडा यांनी चोरुन नेले. या प्रकरणी गोपाल कारकर यांनी दि.१७ मे रोजी दिलेल्या तक्रारीवरुन वाशी पोलीस ठाण्यात गुरनं - १४५/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि.सं. अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या गुन्ह्याच्या तपासा दरम्यान कारकर यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे वाशी पोलीस ठाण्याच्या पथकाने आरोपी बाळासाहेब हणुमंत मोटे व यश बाळासाहेब मोटे यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडे त्या गुन्ह्या संदर्भात चौकशी केली असता त्यांनी तो गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यामुळे त्यांना अटक करुन गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे. तसेच उमरगा तालुक्यातील व्हंताळ येथील विशाल दत्तात्रय जाधव, (वय २६ वर्षे) यांची अंदाजे १५ हजार किंमतीची काळ्या रंगाची स्प्लेंडर प्लस मोटरसायकल क्र एमएच २५ वाय ७२७० ही दि. ११ मे रोजी ११.३० ते १२.४५ वाजण्याच्या सुमारास उमरगा येथील कानडे हॉस्पीटलच्या समोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. या प्रकरणी विशाल जाधव यांनी दि.१७ मे रोजी दिलेल्या तक्रारीवरून उमरगा पोलीस ठाण्यात ३७९ भा.दं.वि.सं. अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# लाठी चार्ज करणाऱ्या अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी



परंडा (प्रतिनिधी) - छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीच्या वेळी धाराशिव येथे पोलीस प्रशासन यांनी शंभू भक्त व शिवभक्त यांच्यावर लाठी चार्ज केला होता. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावे अशी मागणी परंडा येथील सकल हिंदू समाज व छत्रपती शासन ग्रुप हिंदुस्तान यांच्यावतीने एका निवेदनाद्वारे दि.१८ मे रोजी केली आहे.

यावेळी छत्रपती शासन ग्रुप हिंदूस्थान संस्थापक अध्यक्ष प्राणजीत गवंडी, गोरख मोरजकर, छत्रपती शासन ग्रुप उपाध्यक्ष संदिप दैन, प्रहार तालुकाध्यक्ष आप्पासाहेब तरटे, मनसे परंडा शहराध्यक्ष नवनाथ कसबे, शशिकांत क्षिरसागर, हभप बालाजी महाराज बोराडे, सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख सतिश पोळ, कृष्ण जाधव, जयराम धनवे, बालाजी गंभीरे, राम जगताप, महादेव खराडे, भिमराज शिंदे, सुहास पाटील, पवन वाघमारे, रामा गवळी, जिवन गवळी, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# पुन्हा गुटखा तस्करी करणाऱ्यांना पोलिसांनी केले गजाआड

### पुरवठादार कंपनीवर कारवाई करणे आवश्यक

धाराशिव दि्.१८ (प्रतिनिधी) - जिल्ह्यात विशेषतः आंध्र व कर्नाटक या भागातून महाराष्ट्र राज्यामध्ये प्रतिबंधित करण्यात आलेला गुटखा मोठ्या प्रमाणात चोर मार्गाने आणण्याचे काम गुटखा तस्कर करीत आहेत. वारंवार या भागातून गुटख्याची वाहतूक करणाऱ्यांवर गुप्त माहितीच्या आधारे पोलीस कारवाई करीत आहेत. अशीच गुटख्याची चोरून वाहतूक करणाऱ्या एका वाहनासह तस्करी करणाऱ्यांना पोलिसांनी दि.१७ मे रोजी गजाआड केले आहे.

मात्र मुळ उत्पादन करणाऱ्या व पुरवठादार करणाऱ्या कंपनीवर कारवाई केली जात नसल्यामुळे या रॅकेटचे मनोबल वाढत आहे. त्यामुळे उत्पादन करणाऱ्या कंपनीसह पुरवठादारांना जरब बसविण्यासाठी त्यांच्यावर कडक कारवाई करणे गरजेचे बनले आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, जिल्ह्यातील अवैध धंदे व मालाबाबत गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे, सपोनि अमोल मोरे, सचिन खटके, पोहेकॉ अश्विन जाधव, दिलीप जगदाळे, विनोद जानराव, अमोल निंबाळकर, हुसेन सय्यद, समाधान वाघमारे, पोना नितीन जाधवर, अशोक ढगारे, चालक पोहेकॉ संतोष लाटे, पोअं प्रशांत किवंडे यांचे पथक दि.१७ मे रोजी मुरुम पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करत होते. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, एक अशोक लिलॅण्ड कंपनीचे वाहना क्र एमएच ४४ यु २४०५ मध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत केलेल्या गोवा गुटखाची वाहतूक होणार आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्यावरुन पथकाने नमूद ठिकाणी जावून ते वाहन थांबवून



चेक केले असता त्या वाहनामध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत केलेला गोवा गुटखा मिळून आला. तसेच वाहन चालकास त्याचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव नईम रहीम शेख (वय ४० वर्षे) रा. मोमीनपुरा बीड, हुसेन अहमद शेख (वय ३० वर्षे), रा. मोहम्मदीया कॉलनी बीड ता. जि. बीड असे सागिंतले. तसेच पथकाने त्यांच्या ताब्यातील नमुद वाहनातून हिरा पान मसाला ६४ पोते, विमल पान मसाला ५ मोटे पोते, व्ही - १ तंबाखु १ खाकी रंगाचे पोते, महा रॉयल ७१७ तंबाखू ३२ हिरवट रंगाची पोते, आओबाजी पान मसाला १५ पोते, रॉयल २२० तंबाखू १४ पोते, हिरा पान मसाला १४ पोते, रॉयल ७१७ तंबाखू ७ पोते, बॅग, पॉकेट आदीसह अशोक लिलँड कंपनीचे वाहन क्र एमएच - ४४ यु - २४०५ असा एकूण २८ लाख ८९ हजार ७४० रुपये किंमतीचा माल मिळून आला. मिळून आलेला माल जप्त करुन मालासह आरोपी नईम रहीम शेख व हुसेन अहमद शेख यांना ताब्यात घेवून आरोपी विरुध्द मुरुम पोलीस ठाण्यात गुरनं १२४/२०२४ भा.द.वि. सं. कलम ३२८, १८८. २७२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पथकाने त्यांच्या ताब्यातून माल हस्तगत करुन नमुद आरोपीस मालासह मुरुम पोलीसांच्या ताब्यात दिले. ही कामगीरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी व गौहर हसन यांच्या मार्गदर्शनाखाली सथानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल मोरे, सचिन खटके, पोहेकॉ अश्विन जाधव, दिलीप जगदाळे, विनोद जानराव, अमोल निंबाळकर, हुसेन सय्यद, समाधान वाघमारे, पोना नितीन जाधवर, अशोक ढगारे, चालक पोहेकॉ संतोष लाटे, पोअं प्रशांत किवंडे यांच्या पथकाने केली आहे

# कृषी विभागातर्फे उमरगा तालुक्यात गावनिहाय खरीप हंगाम पूर्व बैठकीचे नियोजन

### उगवण क्षमता व बीज प्रक्रिया आवश्यक



धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) - जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, उपविभागीय कृषी अधिकारी महादेव असलकर, तालुका कृषी अधिकारी डी.बी. रितापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली उमरगा तालुक्यामध्ये हंगाम पूर्व तयारीसाठी गावनिहाय बैठकीचे नियोजन करण्यात आले आहे.

दि १८ मे रोजी उमरगा तालुक्यातील बेडगा येथे खरीप हंगाम पूर्व गाव बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीमध्ये सोयाबीन बियाणे उगवण क्षमता तपासणी, बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक, गोगलगाय नियंत्रण, जमिनीच्या प्रकारानुसार सोयाबीन पिकाच्या वाणाची निवड करणे, शेततळे, फळबाग लागवड योजना, कृषी विभागाच्या विविध योजना याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मंडळ कृषी अधिकारी उमरगा दिपक मुळे, कृषी पर्यवेक्षक प्रदीप भोसले, कृषी सहाय्यक आर. डी. पाटील, अतुल गायकवाड आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी सहायक अतुल गायकवाड यांनी व उपस्थितांचे प्रदीप माने यांनी मानले. यावेळी सरपंच, उपसरपंच व गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच तालुका कृषी अधिकारी डी.बी. रितापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली बाबळसुर, रामपूर, सांगवी भिकार, नाईकनगर, सुंदरवाडी या गावांमध्ये खरीप हंगाम पूर्व गाव स्तरीय बैठक घेण्यात आली यामध्ये मंडळ कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, संबंधित गावाचे कृषी सहाय्यक यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांबद्दल मार्गदर्शन केले. तसेच बियाणे उगवण क्षमता तपासणी व बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक करून दाखविले.

# जूनपासून पशुधनाची खरेदी-विक्री करण्यास मनाई

### भारत पशुधन प्रणालीवर जनावरांची नोंद अत्यावश्यक

धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) - ईअर टॅगिंग करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे ते केल्याशिवाय पशुधनाची खरेदी विक्री करण्यासाठी १ जूनपासून मनाई करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा पशु संवर्धन अधिकारी डॉ. वाय.बी. पुजारी यांनी दिली आहे.



पशुधनाची नोंद भारत पशुधन प्रणालीवर असल्याशिवाय पशुधनाची खरेदी किंवा विक्री करता येणार नाही. या पशुधनास पशुवैद्यकीय दवाखान्यामधून मिळणाऱ्या पशुवैद्यकीय सेवाही दिल्या जाणार नाहीत. त्यामुळे सर्व पशुपालकांनी आपल्याकडील लहान व मोठ्या सर्व पशुधनाची ईअर टॅगिंग करुन त्यांची नोंद पशुधन प्रणाली ॲपवर लवकरात लवकर करावी असे आवाहन त्यांनी केले आहे. तसेच राज्यातील सर्व लहान-मोठ्या जनावरांना ईअर टॅगिंग व त्यांची भारत पशुधन प्रणालीवर नोंद बंधनकारक करणेबाबतचा कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग मंत्रालय मुंबई यांचा दि.१७ फेब्रुवारी रोजी शासन निर्णय जाहीर झाला आहे. या निर्णयानुसार भारत पशुधन प्रणालीवर पशुपालकांची सर्व माहिती मोबाईल नंबर, आधार नंबर तसेच पशुपालकांकडे असणारी जनावरांची संपूर्ण माहिती, जनावरांचे वय, लिंग, जात, मिल्कींग स्टेटस् आदी अद्यावत करणे आवश्यक आहे. तर दि.१ जूनपासून ईअर टॅगिंग व भारत पशुधन प्रणालीवरील नोंदीशिवाय जनावरांची खरेदी विक्री करता येणार नाही. तसेच शासकीय पशु वैद्यकीय सेवा दिल्या जाणार नाहीत. केंद्र व राज्य शासनाकडून मिळणारे आर्थिक सहाय्य देय होणार नाही. नैसर्गिक आपत्ती, विजेचा धक्का तसेच वन्य पशुच्या हल्ल्यामुळे मृत्युमुखी पडलेल्या पशुधनास मिळणारी नुकसान भरपाईची रक्कम देय होणार नाही. तसेच राज्यातंर्गत जनावरांची वाहतुक करता येणार नाही. तसे केल्यास पशुधनाचे मालक व वाहतुकदारांवर कारवाई करण्यात येणार आहे. जनावरांची मालकी हस्तांतरण करता येणार नाही.वरील सर्व बाबी टाळण्यासाठी सर्व पशुपालकांनी त्यांच्याकडील सर्व जनावरांना नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून ईअर टॅगिंग करून घ्याव्यात असे आवाहन डॉ. पुजारी यांनी केले आहे.

## संपादकीय

### अवयवदान प्रबोधनाची चळवळ

शरीरातील केवळ कोणता तरी महत्त्वाचा अवयव निकामी झाल्यामुळे मृत्यूशी निकराची झुंज देत असलेली व्यक्ती अनेकांच्या पाहण्यात येत असते. जीवनातील शेवटची घटका मोजत असलेले असे हजारो रुग्ण आपल्या आसपास आहेत की, ज्यांच्या डोळ्यांदेखत अवयव देऊ करणारा दाता दिसत असूनही त्यांना त्यांचे प्राण वाचविता येत नाहीत. लोकसंखेच्या बाबतीत जगात पहिला असणारा एकशे चाळीस कोटींचा भारत देश अवयावदानात मात्र जगात शेवटून दुसरा असावा ही एक शोकांतिका म्हणता येईल. ही वस्तुस्थिती दूर व्हावी या उद्देशाने देशात अनेक व्यक्ती व संस्था अवयवदान या विषयात झटून कार्यरत आहेत. मात्र त्यांचे कार्य एकसंध व्हावे, त्यांना त्यांच्या कार्यात येणाऱ्या सरकारी तसेच इतर प्रकारच्या अडचणी दूर व्हाव्यात, अवयवदान व देहदान या संदर्भातील लोकप्रबोधनाच्या कामाला मोठी चालना मिळावी याकरिता या सर्व लहान-मोठ्या संस्था एका धाग्याने बांधून या चळवळीला व्यापक स्वरूप देण्याचा प्रयत्न फेडरेशन ऑफ ऑर्गन ण्ड बॉडी डोनेशन या संस्थेने महाराष्ट्रात आणि त्याचबरोबर देश पातळीवरही सुरू केला आहे. फेडरेशनची १७ मे २०१५ रोजी स्थापना करण्यात आली आणि २०१७ मध्ये, बरोबर दोन वर्षांनी १७ मे रोजीच फेडरेशन ऑफ ऑर्गन ण्ड बॉडी डोनेशन, मुंबई या नावे ही संस्था धर्मादाय आयुक्तांकडे नोंदविली गेली. यंदा ती आपला नववा वर्धापन दिन साजरा करीत आहे.

ठाणे जिल्ह्यातील वसईसारख्या विकसित भागात आपल्या देहमुक्ती मिशन या संस्थेच्या माध्यमातून अवयव व देहदान या क्षेत्रात अनेक वर्षे काम करणारे संस्थापक पुरुषोत्तम पवार यांना, त्यांना आलेल्या प्रदीर्घ अनुभवातून, एका व्यापक संस्थेची म्हणजेच महासंघाची निकड भासू लागली होती. त्यामुळे त्यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे आणि त्यांच्या दूरदर्शी प्रयत्नांमुळे दि फेडरेशन ऑफ ऑर्गन ण्ड बॉडी डोनेशन' ही संस्था स्थापन झाली.

रक्तदान याविषयी जनमानसात चांगल्या प्रकारे प्रबोधन झालेले आहे. त्यामुळे रक्तदानासाठी स्वतः होऊन पुढे येणारे दाते आज उपलब्ध होत असतात. विविध मंडळे, सामाजिक, राजकीय संस्थांकडून रक्तदानाचे कार्य बऱ्यापैकी सुरू आहे; परंतु नेत्रदान, त्वचादान, अवयवदान, देहदान करण्याची एखाद्या व्यक्तीची इच्छा असूनदेखील प्रत्यक्षात ते करण्याची वेळ येते, त्यावेळी ती व्यक्ती तेथे हयात नसते. तर तिथे असते त्याचे मृत शरीर. अशा वेळी त्याच्या जवळच्या नातेवाइकांची, कुटुंबातील व्यक्तींची भूमिका महत्त्वाची ठरते. अशा अत्यंत हळव्या किंवा भावनोद्दीपक अवस्थेत मृताच्या आप्तजनांना अवयव वा देहदानाची जाणीव करून देणे हे मोठे संयमाचे व जोखमीचे काम असते. अशातही जनजागृती करणाऱ्या अनेक व्यक्ती व सामाजिक संस्था सर्वस्व झोकून काम करत आहेत.

आपापल्या कक्षेत काम करताना त्यांना विविध अडचणी येतात; त्या अडचणींवर मात करण्यासाठी त्यांचे प्रयत्न देखील अपुरे पडतात. फेडरेशनचे संस्थापक पुरुषोत्तम पवार यांनी चळवळीची ही अडचण अनुभवली होती. त्यामुळे त्यांनी अनेक व्यक्ती व संस्थांच्या प्रमुखांना वारंवार भेटून या अडचणींवर तोडगा काढण्यासाठी आपण एकत्र येणे कसे गरजेचे आहे हे समजावून सांगितले. तसेच पुढाकार घेत मुंबई येथे सर जे. जे. हॉस्पिटलमध्ये देहदानाचे कार्य करणाऱ्या सर्व सामाजिक संस्थांची बैठक बोलावली आणि एकमुखाने महासंघाची मुहूर्तमेढ रोवली. फेडरेशनच्या छत्राखाली सर्व स्थानिक संस्थांनी एकत्र येऊन एकमेकांशी समन्वय साधत कार्य सुरू केल्याचे अनेक फायदे दिसू लागले.केवळ मुंबई शहर आणि उपनगरे यांच्यापर्यंतच संगठन मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रभर हे कार्य विस्तारण्याच्या दृष्टीने राज्यातील जवळपास सर्व जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांशी संपर्क साधत कार्याची घोडदौड चालू ठेवली. फेडरेशनची स्थापना करताना आरोग्य क्षेत्रात मोठी रुग्णसेवा देणारे हरकचंदजी सावला यांना प्रथम अध्यक्षपदाचा मान दिला गेला, तर संस्थापक पुरुषोत्तम पवार यांच्या बरोबरीने सुधीर बागाईतकर, विनोद हरिया, कुलीनकांत जी लुठीया, विनायक जोशी आदींप्रमाणेच दधीची देहदान समिती, मानव ज्योत, जीवन ज्योत, सुमती ग्रुप अशा प्रस्थापित सेवाभावी संस्थांच्या कार्यकर्त्यांनी देखील फेडरेशनच्या उभारणीत मोलाचा भार उचलला.कार्यकर्ते नेटाने कामाला लागले. महाराष्ट्रातील सर्व सक्रिय कार्यकर्त्यांना एका मंचावर आणून त्यांच्या अडीअडचणी समजावून घेण्यासाठी २०१६ मध्ये महाराष्ट्र सेवा संघ मुलुंड, मुंबई येथे अवयवदान क्षेत्रात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचे पहिले राज्यव्यापी अधिवेशन यशस्वी रीतीने आयोजित केले गेले. त्यापासून या कामात महाराष्ट्र सेवा संघाचे अनमोल सहाय्य लाभले ते आजतागायत. या अधिवेशनात सुप्रसिद्ध युरॉलॉजिस्ट डॉक्टर वत्सला त्रिवेदी, तसेच डॉक्टर प्रवीण शिनगारे, नागपूरचे चंद्रकांत मेहेर आदी अनेक मान्यवरांचे मार्गदर्शन लाभले. भारतात ज्यांच्यावर २००३ मध्ये पहिले यशस्वी यकृत प्रत्यारोपण झाले होते, असे नाशिक येथील डॉ. भाऊसाहेब मोरे यांना प्रमुख पाहुणे म्हणून पाचारण करण्यात आले होते. संमेलनाच्या या यशानंतर महाराष्ट्रातील अनेक ठिकाणचे कार्यकर्ते फेडरेशनशी जोडले गेले.बाबा आमटे यांच्यापासून प्रेरणा घेऊन अवयवदानाच्या प्रचारासाठी पदयात्रा काढणारे नाशिक येथील सुनील देशपांडे यांना त्यांच्या पदयात्रेसाठी फेडरेशनने संपूर्ण सहकार्य केले. या पदयात्रेद्वारे नाशिक ते आनंदवन (नागपूर मार्गे) या मार्गावर उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भ पायाखाली घातला जाऊन परिसरात अवयवदानाबाबत प्रबोधनाचे कार्य केले गेले. ही पहिली पदयात्रा पूर्ण झाल्यानंतर फेडरेशनतर्फे कोकण आणि महाराष्ट्राची सीमा ओलांडत मडगाव गोव्यापर्यंत दुसऱ्या पदयात्रेचे यशस्वी आयोजन केले गेले. त्यानंतर तिसऱ्या पदयात्रेदरम्यान औरंगाबाद, बीड, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद, तुळजापूरपर्यंत संपूर्ण मराठवाडा पालथा घातला गेला. त्यानंतर नाशिक ते कर्नाटकातील थेट बेळगावपर्यंत चौथी पदयात्रा आयोजित करून पश्चिम व दक्षिण महाराष्ट्र पायाखाली घातला गेला, तर गेल्या फेब्रुवारी महिन्यात फेडरेशनतर्फे उत्तर महाराष्ट्राच्या ग्रामीण आदिवासी जिल्ह्यांमधून पाचव्या खान्देश अवयवदान प्रबोधन रथयात्रेचे आयोजन केले गेले.त्या दरम्यान धुळे, नंदुरबार आणि जळगाव जिल्ह्यातील शहरी आणि आदिवासी भाग पिंजून काढत अवयवदानाच्या प्रबोधनाचा धमाका उडवून दिला गेला. चार पदयात्रा आणि रथयात्रेच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्र व शेजारच्या प्रदेशात अवयवदान प्रबोधनाचा झेंडा रोवताना फेडरेशनच्या कार्याचा ठसा उमटवला गेला. छोट्या छोट्या गावातून आणि मोठ्या शहरात असलेल्या अनेक कार्यकर्त्यांना फेडरेशनच्या कार्यामध्ये सहभागी करण्यात आले. महासंघ राज्यभर बहरला. चौथी पदयात्रा पूर्ण झाली आणि एक महिन्यातच लॉकडाऊन सुरू झाला. अवयवदान क्षेत्र अधिक संवेदनशील असल्यामुळे या कार्याला शंभर टक्के कोरोनाची खीळ बसली. अवयवदानाची चळवळ ठप्प झाली असे वाटत असतानाच, फेडरेशनने झूम मीटिंग, गुगलमीट व बेबीनार अशा अनेक ऑनलाइन कार्यक्रमांचा सपाटा चालूच ठेवत चळवळ जागती ठेवली, बोलती ठेवली. फेडरेशनचे हे कार्य असेच यशस्वीपणे पुढे पुढेच आपण नेणार आहोत, असा आत्मविश्वास आज प्रत्येक कार्यकर्त्याच्या रोमारोमात तयार झालेला आहे.

# होर्डिंग काळ बनून येतो तेव्हा



प्रसिद्धीचे एक माध्यम म्हणून अवाढव्य होर्डिंग उभे करण्याचा पायंडा पडला आणि कालौघात तो अस्ताव्यस्त पसरला. मात्र आधी पुणे आणि त्यानंतर घाटकोपरमधील घटनेने अनधिकृत आणि अजस्त्र होर्डिंगचा धोका किती मोठा आहे, हे दाखवून दिले. त्यापासून धडा घेत भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आता तरी या संबंधीची निश्चित नियमावली आणणे आवश्यक आहे. त्यासाठी यंत्रणा कार्यरत असायला हवी.घाटकोपर येथील होर्डिंग कोसळण्याची घटना आपल्या सुरक्षेचे संकट किती गंभीर आहे, हे दाखवून गेली. अवकाळी पावसाने मुंबईतील छेडानगरच्या पेट्रोल पंपाजवळील हे महाकाय अनधिकृत होर्डिंग कोसळले आणि त्याखाली माणसांबरोबरच बरीच वाहने दबली जाऊन काहींनी जीव गमावला, तर बरेचजण खाली अडकून पडले. मुख्य म्हणजे लोहमार्ग पोलीस कर्मचारी वसाहतीच्या जागेवरील हे अनधिकृत होर्डिंग हटवण्यासाठी मुंबई महापालिकेने अलीकडेच जाहिरादारांना नोटीस बजावली होती. त्यामुळेच याची दखल घेऊन वेळीच योग्य कारवाई झाली असती, तर मोठी जीवितहानी टळली असती. मात्र आपल्याकडील ढिसाळ यंत्रणेकडून ही अपेक्षा ठेवणे अयोग्य आहे. काही वर्षांपूर्वी पुण्यातही अशाच पद्धतीने एक होर्डिंग कोसळून त्याखाली दबल्यामुळे पाच जणांचा मृत्यू झाला होता. त्याखाली अडकल्यामुळे काही वाहनांचेही मोठे नुकसान झाले होते. या अपघाताचे व्हीडिओ आजही अनेकांना आठवत असतील. घाटकोपरमध्ये वादळी वाऱ्यामुळे तशाच घटनेची पुनरावृत्ती घडली. अशा या घातक पद्धतीने होर्डिंग उभारणाऱ्यांवर आता तरी कारवाई होणार का, हा प्रश्न पडतो.यानिमित्ताने मांडावासा वाटणारा पहिला मुद्दा म्हणजे होर्डिंगसाठी एक वेगळे धोरण असणे गरजेचे आहे. मुख्य म्हणजे त्यात घालून दिलेल्या नियमांचे काळजीपूर्वक आणि आग्रहाने पालन झाले पाहिजे. मग ते होर्डिंग महापालिकेच्या जागेत असो, रेल्वेच्या जागेत असो वा अन्य कोणाचे असो; अशा प्रत्येक होर्डिंगसाठी हे नियम आवश्यक आहेत. पुण्यातील होर्डिंग दुर्घटनेबाबत बोलायचे तर ते रेल्वेच्या जागेत होते. त्यामुळे महानगरपालिकेने याचा आमच्याशी काही संबंध नाही, असे म्हणत हात झटकले. मात्र हे काही या समस्येवरचे उत्तर असू शकत नाही. जबाबदारी कोणी ना कोणी स्वीकारायलाच हवी. म्हणून सर्वकष धोरणांचा अवलंब होणे गरजेचे असून त्यात सर्वाधिक महत्त्वाचा मुद्दा संरक्षणाचा असायला हवा.सुरक्षा आणि संरक्षणासंबंधीचे हे निकष त्या त्या संबंधित यंत्रणेने घालून दिले पाहिजेत आणि त्याच्या अंमलबजावणीकडेही लक्ष ठेवले पाहिजे. म्हणजेच एखाद्या कॉन्ट्रॅक्टरने सुरक्षा आणि संरक्षणाचे निकष वा नियम ठरवून चालणार नाही. कारण ते नेहमीच आपल्या सोयीचे नियम ठरवणार. म्हणूनच हे नियम ठरवणारी यंत्रणा देशपातळीवर कार्यरत असणे ही काळाची गरज आहे, असे म्हणावे लागेल. अशी एखादी यंत्रणा असेल तर तिचे निगुतीने पालन झाले पाहिजे. तरच यापुढे अशा दुर्घटना घडण्याची शक्यता कमी होईल. अशा दुर्घटना घडल्यानंतर दर वेळी तात्पुरती कारवाई केली जाते. मात्र काही काळातच तो विषय मागे पडतो. नुकसानभरपाई द्या आणि विषय संपवा, असाच यामागचा एकूण विचार असतो. असे असेल तर अशा प्रकारच्या घटना सातत्याने घडणे ही अत्यंत स्वाभाविक बाब आहे. त्यामुळेच आता अशा चुका सुधारण्याखेरीज पर्याय नाही.केवळ परवानगी दिली आणि सुरक्षेच्या सर्व नियमांचे पालन केल्याची खात्री केली म्हणजे सगळे प्रश्न सुटले असेही समजण्याचे कारण नाही. होर्डिंग उभे राहिल्यानंतर वेळोवेळी त्याची तपासणी होणेदेखील अत्यंत गरजेचे आहे. कदाचित पहिल्यांदा सगळ्या नियमांचे पालन केले जाईलही, मात्र नंतरच्या काळातही त्यांचे पालन केले जाते की नाही, हे पाहणे गरजेचे आहे. त्यासाठी तपासणीचे महत्त्व जाणून घ्यायला हवे. दर तीन महिने, सहा महिने, एक वर्ष अशा ठरावीक कालावधीनंतर प्रत्येक होर्डिंगची तपासणी केली गेली, तर काळानुरूप उद्भवणाऱ्या त्रुटी समोर येतील. साहजिकच त्या दूर करण्यासाठी योग्य ती पावले उचलणे शक्य होईल. म्हणूनच तपासणीचा नियमही पाळणे गरजेचे आहे.

अशा होर्डिंगचा आकार किती असावा, ते बनवण्यासाठी कोणत्या साहित्याचा वापर करावा या संबंधीही ठोस नियम असायला हवे. सध्या या संबंधीची कोणतीही नियमावली नसल्यामुळे दुर्घटनांचा धोका वाढता आहे.

अनेकदा होर्डिंगचा समतोल ढासळतो आणि ते कोसळते. वादळासारख्या नैसर्गिक दुर्घटनांमध्ये अशा घटनांची शक्यता अनेक पटींनी वाढते. नेमका पाऊस, अवकाळी, वादळ वा तीव्र वारे असताना लोक झाडे वा मोठ्या होर्डिंगच्या आडोशाला उभे राहतात आणि अशा दुर्घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात जीवितहानी होते. ही समस्या वा वास्तव लक्षात घेऊन यापुढे तरी होर्डिंग उभारताना त्याची मापे काय असावीत, त्याला आधार देणाऱ्या घटकांचे वा साहित्याचे मोजमाप आणि प्रकार कोणता असावा, त्यांचा दर्जा कसा असावा, इथपर्यंतच्या सगळ्या गोष्टींचा विचार करण्याची वेळ आता आली आहे. तरच अशा घटनांची पुनरावृत्ती टळू शकेल. अन्यथा, वारंवार अशा घटना पाहायला मिळतील, यात शंका नाही.

होर्डिंग पॉलिसी ठरवताना ती कुठे असावी, दोन होर्डिंगमध्ये नेमके किती अंतर असावे याचादेखील विचार व्हायला हवा. या दृष्टीने अन्य देशांमधील स्थिती पाहिली तर मुळात तिथे इतक्या मोठ्या संख्येने आणि जागोजागी होर्डिंग नसतात. असतात ती साधारणतः हमरस्त्याच्या कडेला असतात. म्हणजेच हा भाग थेट रहदारीच्या, वर्दळीच्या जागेपासून पुरेशा सुरक्षित अंतरावर असतो. त्यामुळेच चुकून एखादे होर्डिंग पडले तरी ते रस्त्यावर येत नाही. बाजूच्या मोकळ्या जागेत पडू शकते. स्वाभाविकच परदेशामध्ये अशा दुर्घटना घडल्या तरी जीवितहानी होण्याची शक्यता नगण्य वा बरीच कमी असते. तिथे माणसाच्या जीवाला मोठी किंमत असते. उलटपक्षी, आपल्याकडे हा विचारही केला जात नाही. आपल्याकडे माणसाचे आयुष्य हीच एक सर्वात स्वस्त बाब झाली आहे. म्हणूनच आपण या बाबतीत अजून कित्येक योजने मागे आहोत, हे समजून घ्यायला हवे.आपल्याकडेही हायवेवर अनेक होर्डिंग बघायला मिळतात. पण ती रस्त्यावर नसतात. बाजूला असतात. त्यामुळेच त्यातील एखादे पडले तरी रस्त्यावर येणार नाही, हे पाहिले जाते. मात्र शहरात हा नियम पाळला जात नाही, कारण गर्दीच्या भागात त्यासाठी पर्याप्त जागाच उपलब्ध नाही. खेरीज होर्डिंग लावण्यामागील मुख्य उद्देश तो लोकांच्या सहज नजरेस पडावा असा असतो. त्यामुळे शहरी भागांमध्ये तो आडबाजूला वा रस्त्यापासून बऱ्याच दूरवर लावूनही परिणाम साधणार नाही. म्हणूनच मग लोकांना कुठूनही सहज दिसतील आणि त्यांचे लक्ष वेधून घेतील अशी जागा हेरून ही महाकाय होर्डिंग्ज उभारली जातात. मात्र योग्य जागेअभावी अशी अजस्र होर्डिंग नेहमीच संभाव्य दुर्घटनेची आशंका जागी ठेवतात.

हे टाळण्यासाठी आधी रहिवासी वा गर्दीच्या भागातील होर्डिंगचा आकार किती असावा, हे सुनिश्चित असणे आवश्यक आहे.ताजी घटना होर्डिंगचे वाढलेले प्रचंड प्रमाण दर्शवणारी आहे. पुण्यातील दुर्घटनेवेळी देखील हाच मुद्दा समोर आला होता. म्हणूनच यापुढे होर्डिंगचा आकार किती असावा याबाबतच्या नियमांमध्ये अधिक स्पष्टता यायला हवी. खेरीज ते उभे केले जाणार असणाऱ्या भागातील वातावरण, तेथील समस्या या सगळ्यांची माहिती घेऊन नियम ठरवायला हवे. खेरीज आधी उल्लेख केल्याप्रमाणे दर काही कालावधीनंतर त्याची तपासणी होणेही गरजेचे आहे. अशा तपासणीमध्ये स्क्रू ढिले झाले आहेत का, मजबुती देण्यासाठी वापरण्यात आलेले साहित्य मूळ जागेपासून हलले आहे का, या साहित्याला गंज वा यांसारखा अन्य धोका निर्माण झाला आहे का, अशा अनेक गोष्टींची माहिती मिळू शकते. हे सगळे नीट असल्याचे बघण्याची जबाबदारी केवळ त्या ठेकेदाराची नाही, तर या सगळ्याचे नियमन करणाऱ्या यंत्रणेवरही असली पाहिजे. हवे तर यासाठी काही शुल्क आकारण्यासही हरकत नाही. मात्र या यंत्रणेतल्या लोकांनी तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. शेवटी ठेकेदार वा होर्डिंग उभारणारे कधीच आपल्या चुका मान्य करणार नाहीत वा पुरेशा काळजीपूर्वक तपासणीही करणार नाहीत, हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. मात्र एखाद्या जबाबदार यंत्रणेकडून तपासणी झाली तर कच्चा दुवा शोधणे शक्य होईल. आतासारखीच पुण्यातील होर्डिंग दुर्घटनेनंतर बरीच चर्चा झाली होती. मात्र त्यानंतर आजपावेतो अशा घटना रोखण्यासाठी एकही पाऊल उचलले गेलेले नाही. खरे तर त्या घटनेनंतर सविस्तर विश्लेषण होऊन दोषींना शिक्षा होण्यापर्यंतची पावले उचलली जाणे अपेक्षित होते. मात्र तसे काही घडल्याचे ऐकिवात नाही. साहजिकच काही दिवसांनी लोक अशा घटना विसरून जातात. पुढच्या वेळी तशीच घटना घडते, तेव्हाच त्याचे स्मरण होते. म्हणूनच आताच्या ताज्या घटनेची तरी संपूर्ण आणि सखोल चौकशी व्हायला हवी आणि दोषींना कठोर शिक्षाही व्हायला हवी. हे प्रकरण शेवटपर्यंत व्यवस्थित हाताळले गेले, तरच भविष्यात काही सुधारणा दिसून येईल. अन्यथा परिस्थिती बदलणार नाही.

**-विवेक वेलणकर: सामाजिक कार्यकर्ते**

# भगवंताचे प्रेम वाढविण्याची कृती करावी!

## अध्यात्म - ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज



जगात देवाणघेवाण हा नियमच आहे. लाकडाचे दोन तुकडे जोडायचे असतील, तर प्रत्येकाचा थोडा थोडा भाग तासून नंतर एकमेकांत बसवितात आणि मग उत्तमरीतीने सांधा बसतो. त्याप्रमाणे प्रत्येक माणसाने आपापले दोष जर थोडे थोडे तासून टाकले, तर परस्पर प्रेमाचा सांधा खात्रीने उत्तम बसेल. याकरिता विचाराने आणि काळजीने वागणे जरूर आहे. घरामध्ये काय किंवा बाहेर काय, प्रेमाचा धाक असावा, भीतीचा धाक असू नये. जसे आई आणि मुलांचे प्रेम असते, तसेच भगवंतावर श्रद्धा ठेवावी. नेहमी आपले वर्तन चांगले ठेवावे.

असा नियम आहे की, ज्या भक्ताचे भगवंतावर प्रेम आहे, तो भजनामध्ये नाचत असताना त्याचा स्पर्श दुसऱ्याला झाला की, तोही भगवंताच्या भक्तीत तल्लीन होऊन नाचू लागतो. भगवंताचे प्रेम हे एक मोठे वेड आहे, ते ज्याला लाभेल, तो भाग्याचा खरा! एक भगवंताचे प्रेम लागले की, वाणीमध्ये सर्व चांगले गुण येतात. पुस्तके वाचून किंवा नुसत्या बुद्धीने जगाची अशाश्वतता केव्हाही कळणार नाही. भगवंताचे प्रेम वाढले की, ती आपोआप कळू लागते.

एखाद्या माणसाचे तोंड आल्यावर, पोटामध्ये भूक असूनसुद्धा त्याला खाता येत नाही किंवा अन्नाला चव लागत नाही. त्याचप्रमाणे आतमध्ये भगवंताचे प्रेम असून सुद्धा आपण बाहेर प्रपंचामध्ये आसक्त असल्यामुळे, भगवंताच्या नामाची गोडी वाटत नाही. तोंड बरे व्हायला, जसे प्रथम औषध घ्यावे, त्याचप्रमाणे नामाची गोडी यायला आपण प्रपंचाची आसक्ती कमी करावी.ही प्रपंचाची आसक्ती सोडणे किंवा कमी करणे हे फार कठीण काम आहे, त्याकरिता भगवंताबद्दल आपलेपणा, अनुसंधान आणि सत्संग हेच तीन उपाय आहेत. भगवंत हा बहुरूपी आणि अनंत ठिकाणी नटणारा असा आहे म्हणून त्याच्या प्राप्तीसाठी अनंत साधने असली पाहिजेत. ज्याच्या त्याच्या मनोरचनेप्रमाणे जो तो आपले साधन करील. पण या सर्व साधनांमध्ये भगवंताचे प्रेम हे सर्वसामान्य असले पाहिजे. भगवंताचे प्रेम हे कोणत्याही साधनाचा प्राण आहे.

ते प्रेम मागण्यासाठी रोज भगवंताची प्रार्थना करावी. ज्याला भगवंताचे प्रेम येईल, तो सृष्टीकडे कौतुकाने पाहील. भक्त भगवंताच्या भक्तीत तल्लीन झाला की, त्याच्याआड दुसरे काहीही येऊ शकत नाही. भगवंताच्या नामाला नीती हे पथ्य आहे. ते सांभाळून जो वागेल, त्याचे भगवंतावरचे प्रेम वाढेल. भगवंतावर अत्यंत निष्ठा ठेवा, प्रेम ठेवा. भगवंत हा कष्टसाध्य नसून सुलभसाध्य आहे. जो हिनाहून हीन आणि अडाण्यांतला अडाणी आहे, त्यालासुद्धा मिळणारा असा भगवंत आहे.तात्पर्य : ज्याला भगवंताचे प्रेम यावे असे वाटते, त्याने नाम घेणे, हाच एक मार्ग आहे.

## सा.राशी भविष्य



दि. १९ मे २०२४ ते २५ मे २०२४

........................

मेष : व्यवसायात चांगली स्थिती राहणार आहे. काही निर्णय धडाडीने व धाडसाने घ्याल. आर्थिक निर्णय योग्य ठरणार आहेत. तुम्हाला बदली हवी असेल तर प्रयत्न करावयास हरकत नाही. शासकीय कामात यश मिळेल. तुमच्या कर्तृत्वाला व कर्तबगारीला मोठ्या प्रमाणावर वाव मिळणार आहे. प्रतिष्ठा लाभेल.

वृषभ : आर्थिक लाभाच्या दृष्टीने दिवस चांगला आहे. उधारी वसूल होईल. अनपेक्षितरीत्या उधारी-येणे वसूल होईल. एखादी गुप्तवार्ता समजेल. जिद्द, धाडस यामुळे जोरदार प्रगती करू शकाल. नोकरीतील व्यक्तींनाही दिवस चांगला जाईल. कौटुंबिक सौख्याच्या दृष्टीने मात्र थोडे अनुत्साही वातावरण राहील.

मिथुन : गेल्या दोन दिवसांपेक्षा आजचा दिवस चांगला आहे. मरगळ निघून जाईल. सध्याची ग्रहास्थिती आपणाला अत्यंत अनुकूल आहे, त्याचा फायदा करून घ्यावा. व्यवसायातील आपले निर्णय योग्य ठरवून त्याचा लाभ तुम्ही उचलू शकाल. कौटुंबिक जीवनात प्रसन्नतेचे वातावरण राहील.

कर्क : आजचा दिवस चांगला जाणार आहे. सार्वजनिक कामात मान-सन्मानाचे योग येतील. तुमच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव वाढेल. नोकरीत व व्यवसायात चांगली परिस्थिती राहील. प्रवास सुखकर होतील. उमेद व उत्साह वाढणार आहे. अडचणींवर मात कराल.

सिंह : अनेकांशी चांगले संबंध प्रस्थापित करू शकाल. फायद्याचे व लाभाचे करार करू शकाल. आपल्यापैकी काहीजण अडचणीत असतील तर त्यांना मित्रांची मदत मिळेल. उधारी वसूल होईल. मुला-मुलींसंदर्भात एखादी भाग्यकारक घटना घडेल.

कन्या : प्रसन्नता लाभेल. व्यवसायात फार मोठी उलाढाल करू शकाल. जागेचे काही प्रश्न असल्यास ते सुटण्याच्या दृष्टीने काहीतरी मार्ग दिसेल. ज्यांना बदली हवी आहे त्यांनी प्रयत्न करावयास हरकत नाही. प्रवास सुखकर होतील. आर्थिक लाभाचे प्रमाण वाढेल. तुमच्या कार्यक्षेत्रात तुम्हाला विशेष संधी लाभेल.

तूळ : गाठीभेटी, प्रवास यादृष्टीने दिवस चांगला आहे. काहींना प्रवासाचे योग येतील. व्यवसायात नवीन हितसंबंध निर्माण करू शकाल. उत्साह व उमेद वाढेल. शासकीय कामांसाठी सध्याची ग्रहास्थिती चांगली नाही. कामाचा ताण जाणवेल. निर्णय चुकणार आहेत, ते घेण्याचे टाळावेत. आर्थिक स्थिती समाधानकारक राहील.

वृश्चिक : आरोग्य उत्तम राहील. अनेकांशी सुसंवाद साधाल. आपली रास ही बौद्धिक रास असल्यामुळे आपण साहित्य, बौद्धिक वाद, परिसंवाद यामध्ये विशेष रस घेत असता त्याला आज संधी मिळेल. जागेचे काही प्रश्न असल्यास ते सुटण्याच्या दृष्टीने काही मार्ग दिसेल. मनोबल वाढेल. तुम्हाला त्रास देण्याची हितशत्रूंची हिंमत होणार नाही.

धनु : बौद्धिक क्षेत्रातील व्यक्तींना आजचा दिवस चांगला जाईल. अडीअडचणीतील लोकांना मदत कराल. आपण विशाल मनाचे व दानशूर आहात त्यामुळे अडचणीतील लोकांना सढळ हस्ते मदत कराल. व्यवसायात व नोकरीत तुमचे प्रभुत्व राहील. अपेक्षित पत्रव्यवहार होईल. गाठीभेटी व परिचय होतील.

मकर : मनोबल व उत्साह वाढेल. आरोग्य उत्तम राहील. प्रगतीला वा विकासाला अनुकूल असे वातावरण मिळेल. नवा मार्ग दिसेल. तुम्ही सध्या योग्य मार्गावरून चालला आहात. मित्र उपयोगी पडतील. वैवाहिक जीवनात मात्र थोडे नरम गरम वातावरण राहील.

कुंभ : आज कोणाच्याही सहकार्याची तुम्हाला अपेक्षा करता येणार नाही. भागीदारी व्यवसायात मतभेद होतील. आर्थिक क्षेत्रात लाभाचे प्रमाण चांगले राहाणार आहे. व्यवसायात धाडस करावयास हरकत नाही. अनेक गोष्टी मनासारख्या होतील.

मीन : आरोग्याकडे लक्ष द्यावे. काहींना शारीरिक ताण व दगदग जाणवेल. खर्चाचे प्रमाण कमी होईल. मनोरंजनाकडे कल वाढेल. बांधकाम व बांधकामाचे साहित्य, हॉटेल या क्षेत्रातील व्यक्तींना विशेष लाभ होईल. वरिष्ठांचे सहकार्य लाभेल. वैवाहिक सौख्य लाभेल.

१९ मे ला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर मंगळ, शुक्र व सुर्याचा दुहेरी प्रभाव आहे. ऐश्वर्यात जगणे तुम्हाला आवडते. आपले व्यक्तीमत्व रूबाबदार ठेवण्यासाठी तुम्ही दक्ष असता. तुमची ग्रहणशक्ती उत्तम असते. समस्येच्या मुळाशी जाऊन तुम्ही वेगवेगळ्या बाजूंनी त्यावर प्रकाश टाकू शकता. तुमच्याकडे उत्साहाचा प्रचंड साठा आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर रहाणे तुम्हाला जमते. सामाजिक बांधिलकी तुम्ही मानता. समाजात काही आदर्श, नीतिमूल्ये प्रस्थापित करण्यासाठी झटता. मानसन्मान, किर्ती तुमच्याकडे विनासायास चालून येतात.

स्वत:लाच सर्व काही समजते अशी भावना ठेवणे इष्ट ठरणार नाही. अपकीर्तीची तुम्हाला सर्वात जास्त भीती वाटते. म्हणून आपले व्यवहार चोख ठेवा. अस्मिता व अहंकार यातली रेषा ओळखा. डोळ्यांच्या विकारांपासून काळजी घ्या. अतिश्रमांमुळे हृदयावर ताण पडू देऊ नका. सूर्यनमस्कार हा उत्तम व्यायाम.

कार्यक्षेत्र : व्यवस्थापन हे सर्वात अनुकूल कार्यक्षेत्र आहे. त्यादृष्टीने पदव्युत्तर व्यवस्थापनाची पदवी पदरात पाडून घ्या. राज्य वा केंद्र शासन, रेल्वे बोर्ड, संरक्षण दल, पोलिस खाते या ठिकाणी सहज प्रवेश मिळेल. प्रशासकीय सेवेत आपल्या कार्यक्षमतेची चुणूक दाखवाल. नाटक, चित्रपट, दूरदर्शन मालिकांचे लेखन, दिग्दर्शन वा छायाचित्रण या क्षेत्रात आपल्या प्रतिभेला वाव मिळेल.

प्रणयी जीवन : आपला जोडीदार आपल्यासारखाच दिलदार, उदार अंत:करणाचा असावा असे तुम्हाला वाटते. केवळ पैशाला किंमत देण्यापेक्षा आपण करीत असलेल्या नव्या निर्मितीचे कलागुणांचे त्याने कौतुक करावे अशी तुमची अपेक्षा असते. स्वार्थी, कंजूष वृत्तीची माणसे तुम्हाला आवडत नाहीत. जानेवारी २० ते फेब्रुवारी १८ दरम्यानच्या व्यक्तींशी तुमचे सूर जुळतील.

वर्षफळ : व्यवस्थापन कौशल्याबल वरिष्ठांकडून पसंतीची पावती मिळेल. प्रशासन व कर्मचारी संघटना यात मध्यस्थाची भूमिका बजावाल. फेब्रुवारी मार्च मध्ये ध्येयधोरणांची आखणी होईल.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com




# मी एकलव्य



टर्निंग पॉइंट : युवराज अवसरमल

ज्येष्ठ अभिनेत्री निर्मिती सावंत यांचा सुपुत्र अभिनय सावंत याने मनोरंजनाच्या क्षेत्रात आपले करिअर करण्याचा निर्धार पक्का केला आहे. त्याची एक नवीन वेबसीरिज येणार आहे. अभिनयचे शालेय शिक्षण दादरच्या पोर्तुगीज चर्चजवळील अवर लेडी ऑफ सलवेशन बॉईज स्कूल येथे झाले.

शाळेमध्ये ऑपेरा कार्यक्रमात अल्लाउद्दीनचा दिवा सांभाळणारा जीन त्याने साकारला होता. महाराष्ट्र राज्य शासनाच्या नाट्य स्पर्धेत डबल क्रॉस' नावाचे नाटक त्याने केले होते, त्यामध्ये अपहरण केलेल्या लहान मुलाची भूमिका त्याने केली होती. नेहरू सायन्स सेंटरच्या कल्पना एक आविष्कार अनेक' या उपक्रमातून देवेंद्र पेमच्या एकांकिकेमधून त्याने काम केले. अकरावी, बारावी त्याने सेंट झेवियर्स कॉलेजमधून केले. त्यानंतर त्याने बी. एम. एस. हा कोर्स सिद्धार्थ कॉलेजमधून केला. गंगुबाई नॉन मॅट्रिक' मालिकेसाठी त्याने अनेक कथा सुचवल्या. ही पोरगी कोणाची' या चित्रपटासाठी व कॉन्स्टेबल कामना कामतेकर या मालिकेसाठी त्यांने कार्यकारी निर्माता म्हणून काम केले. त्याने संकलनाचे काम शिकून घेतले, केवळ निरीक्षणाने तो संकलन शिकला. एखादी गोष्ट एकलव्यासारखी शिकण्याची त्याची वृत्ती पुढे वाढतच गेली आणि यामुळे अनेक नव्या गोष्टी त्याने आत्मसात केल्या. ही पोरगी कोणाची' या चित्रपटाच्या वेळी त्याच्या मेकिंगच्या वेळी त्याने संकलनाचे कार्य केले. नंतर त्याने शॉर्ट फिल्म केली.

त्यानंतर त्याने एमपीएससी, यूपीएससीचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. त्यावेळी तो पूर्णपणे मनोरंजन क्षेत्रापासून दूर गेला होता. दिल्लीला जाऊन त्याने यूपीएससीची परीक्षा दिली होती. त्यानंतर त्याच्या जीवनात टर्निंग पॉइंट आला, श्रीमंत दामोदर पंत' या चित्रपटांमध्ये त्याला भूमिका करण्याची संधी मिळाली. मोहन नावाची व्यक्तिरेखा साकारण्याची संधी त्याला मिळाली. त्यामध्ये सोनू निगमने गायलेल्या गाण्यावर अभिनय करण्याची संधी त्याला मिळाली. गाणे होते- मॅचिंग मॅचिंग नवरा' पाहिजे. या चित्रपटाचे दिग्दर्शक केदार शिंदे व कलावंत भारत जाधव यांच्याकडून भरपूर त्याला शिकायला मिळाले. त्यानंतर अकल्पित' नावाचा चित्रपट त्याने केला. त्यामध्ये स्क्रिझोफेनिया मनोरुग्णाची भूमिका त्याने साकारली होती. त्यावेळी त्याचे वय २५ वर्षे होते आणि त्या चित्रपटांमध्ये ४० वयाच्या मनोरुग्णाची भूमिका साकारण्याचे आव्हान त्याच्यापुढे होते. त्या चित्रपटांमध्ये रेणुका शहाणे, मोहन आगाशे, निर्मिती सावंत, अतुल तोडणकर हे कलावंत होते. त्या नंतर नकटीच्या लग्नाला यायचं' या झी वाहिनीवरील मालिकेत त्याने काम केले. त्यामध्ये विनोदी भूमिका साकारण्याची संधी त्याला मिळाली. या मालिकेमुळे तो घराघरात पोहोचला. उषा प्रवीण गांधी या फिल्म्स स्कूलसाठी त्यांने एक इंग्लिश चित्रपट लिहिला व दिग्दर्शित केला. या इंग्लिश चित्रपटाला चांगलाच प्रतिसाद मिळाला. हा चित्रपट त्या फिल्म स्कूलमध्ये बेस्ट स्क्रीनप्ले म्हणून दाखविला जातो. नंतर त्याने देवा शप्पथ या मालिकेमध्ये मनुष्यरुपी हनुमानाची भूमिका साकारली. त्यानंतर त्याने सोनी वाहिनीवरील नवरी मिळे नवऱ्याला' ही मालिका केली. ही मालिका प्रचंड गाजली. त्यामध्ये उदय आल्हाद-राव भालेराव ही विनोदी व्यक्तिरेखा साकारण्याची संधी त्याला मिळाली. त्यामध्ये त्याच्यासोबत देविका दप्तरदार, किशोर कदम हे कलावंत आहेत. या चित्रपटाचा सिनेमाटोग्राफर तेजस ओक होता. जर्मनीमध्ये सिनेमॅटोग्राफरचा कोर्स करण्यासाठी तो तेथे गेला होता, तेव्हा त्याला या चित्रपटाचे लेखक व दिग्दर्शकाकडून शिफारस पत्र हवे होते व ते देताना अभिनयला खूप आनंद झाला. त्याच्या कामाची दखल घेतल्याचा त्याला गर्व वाटला. एक नवीन वेबसीरिज तो लिहून दिग्दर्शित करणार आहे. तसेच चित्रपट व मालिकेच्या निर्मिती क्षेत्रात देखील उतरण्याचा त्याचा मानस आहे, त्याच्या या भविष्याच्या वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

## आरोग्य विम्यासाठी वयाची अट काढली, पण अभय दातार, मुंबई ग्राहक पंचायत

मागच्या महिन्यात एक महत्त्वाची बातमी सगळीकडे प्रसिद्ध झाली, ती म्हणजे आता आरोग्यविमा घेण्यासाठी कोणतीही अट नाही. सर्वात जास्त खूश झाले ते साहजिकच वरिष्ठ नागरिक. यांनी २० मार्च, २०२४ रोजी एक परिपत्रक काढले आणि त्यात ही तरतूद केली. या परिपत्रकात इतरही काही नव्या तरतुदी आहेत आणि त्या सर्व १ एप्रिल, २०२४ पासून लागू झाल्या आहेत. या सर्व नव्या तरतुदींचा अभ्यास करून त्या कितपत व्यवहार्य आहेत याचा विचार करावा लागेल. वयाची अट काढून टाकली आहे ती फक्त वरिष्ठ नागरिकांसाठी नाही, तर लहान मुले, कॉलेजात जाणारे विद्यार्थी, इत्यादींसाठीसुद्धा ही अट काढून टाकण्यात आली आहे. विम्याच्या हप्त्याचा विचार केला, तर लहान व तरुण यांच्यासाठी साहजिकच हा हप्ता खूप कमी असू शकतो. मात्र ज्येष्ठ नागरिकांचे तसे नाही. जितके वय जास्त, तितका हप्ताही जास्त असणार. ज्या वयात आपण फारसे काही कमवत नाही, त्या वयात भरमसाट हप्ता भरणे किती जणांना परवडणार आहे? ज्यांचा आधीपासून आरोग्य विमा आहे, त्यांच्या तक्रारी आहेत की, कंपनीने विम्याचा हप्ता भरमसाट वाढवला. या पार्श्वभूमीवर सदर परिपत्रकातील इतर बदलही लक्षात घ्यायला हवेत.

पूर्वापार काही आजार असेल, तर आता पॉलिसी काढताना असा / असे आजार सुरुवातीचे ३६ महिने विचारात घेतले जाणार नाहीत. पूर्वी ही अट ४८ महिन्यांची होती. याचा फायदा नवीन पॉलिसी धारकांना होईल. मात्र तरीही असा कोणताही आजार असेल, तर तो लपवून न ठेवता त्याचा तपशील पॉलिसीच्या अर्जात दिला गेला पाहिजे. काही आजार अथवा व्याधी पॉलिसी घेतल्यानंतर उद्भवू शकतात. उदाहरणार्थ मोतीबिंदू किंवा गर्भाशयाशी संबंधित शस्त्रक्रिया. यासाठी पहिली पॉलिसी घेतल्यापासून काही ठरावीक कालावधीपर्यंत आरोग्य विम्याचे कवच मिळत नाही. याबद्दल ज्या अटी आहेत त्यांचा स्पष्ट उल्लेख पॉलिसीमध्ये केलेला असतो, तो नीट वाचणे आवश्यक आहे. नवीन परिपत्रकानुसार असा कालावधी जास्तीत जास्त ३६ महिन्यांचा ठेवण्यात आला आहे.

आयुष उपचार ही संकल्पना काही वर्षांपूर्वी आरोग्य विम्यात अंतर्भूत करण्यात आली. या अंतर्गत आयुर्वेद, योग, निसर्गोपचार, युनानी, सिद्धा आणि होमिओपॅथी या सर्व उपचार पद्धतींना मान्यता देण्यात आली आहे. नवीन परिपत्रकात निर्देश दिले आहेत की या उपचार पद्धतींना इतर उपचार पद्धती सारखेच मानले जावे. म्हणजे या उपचार पद्धतींना कमी कवच आणि इतर उपचार पद्धतींना जास्ती कवच, असे असता कामा नये. जेव्हा एखाद्या उपचार पद्धतीबाबत दुमत होते, तेव्हा विमा लोकपाल तज्ज्ञांची मदत घेतात. आता प्रश्न असा आहे की योग, निसर्गोपचार, अशा पद्धतींबाबत दुमत झाले, तर लोकपालांकडे त्या क्षेत्रातील तज्ज्ञ आहेत का?आता एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आरोग्य विम्याचा हप्ता. पॉलिसीचे नूतनीकरण करताना हा हप्ता भरमसाट वाढला अशी एक सर्वसामान्य तक्रार वरिष्ठच नव्हे, तर इतर पॉलिसीधारकसुद्धा करतात. जरी नियामकाने आरोग्य विमा कंपन्यांना दर तीन वर्षांनी हप्त्यात बदल करण्याची मुभा दिली असली, तरी याबाबत कोणतेही सुस्पष्ट निर्देश नाहीत. माझा स्वत:चा अनुभव असा की माझ्या पॉलिसीचा हप्ता तब्बल ६८ टक्क्यांनी वाढविण्यात आला आणि त्याबाबत संबंधित कंपनीने काहीतरी थातुरमातुर स्पष्टीकरण दिले, जे अर्थातच पटण्यासारखे नव्हते. ज्यांची पॉलिसी जुनी आहे आणि अनेक वर्षांत दावा करण्याचा प्रसंग आलेला नाही, अशांचा अनुभवही थोड्या फार फरकाने असाच आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य विमा पॉलिसीमध्ये सर्वसाधारणपणे असलेली दुसरी एक अट म्हणजे को-पेमेंट'. यानुसार जो काही वैद्यकीय खर्च होईल त्याच्या २० टक्के रक्कम पॉलिसीधारकाने भरायची असते आणि उर्वरित ८० टक्के रकमेचा दावा विमा कंपनीने तपासायचा असतो. पॉलिसी नीट न वाचल्याने दावा दाखल झाल्यावर कंपनी जेव्हा या रकमेबद्दल सांगते, तेव्हा हमखास वाद निर्माण होतात. अर्थात बऱ्याच वेळा एजंट मंडळीही याबाबत काही सांगत नाहीत. वयाची अट काढल्यामुळे ज्येष्ठ नागरिक आरोग्य विम्यासाठी पुढे येतील; परंतु याचा हप्ता किती असेल, ते वयावर आणि सध्या असलेल्या आजारांवर अवलंबून आहे. जरी काही आजार नसेल, तरी एखाद्या ८० वर्षे वयाच्या नागरिकाला फार मोठा हप्ता भरावा लागू शकेल. ही रक्कम त्याला परवडेल का हा महत्त्वाचा प्रश्न आहे. याचे अधिक स्पष्टीकरण असे की नियामकाने हे जे नवीन परिपत्रक काढले आहे, त्यात असेही म्हटले आहे की, सध्या जे आजार आहेत ते स्वीकारून विमा कंपन्यांनी पॉलिसी द्यावी. हे अनिवार्य नाही, पण विमा कंपन्यांनी यासंबंधी काही एक नियमावली तयार करावी. प्रश्न असा आहे की, हे गणित जर फायद्याचे नसेल, तर विमा कंपन्या या फंदात कशाला पडतील? जर काही गंभीर आजार असतील, तर नवीन पॉलिसीसाठी विमा कंपनी किती हप्ता लावेल हे काळच सांगेल; पण तो भरमसाट असेल हे नक्की.एक संभाव्य धोका म्हणजे ग्राहकाची दिशाभूल करून एखादी पॉलिसी त्याच्या गळ्यात मारली जाणे. सध्या हे प्रकार घडत आहेतच, विशेषत: वरिष्ठ नागरिकांच्या बाबतीत. त्यामुळे शिथिल केलेल्या बाबींचे गुलाबी चित्र रंगवून अशा नागरिकांची फसवणूक केली जाऊ शकते. त्यामुळे कोणत्याही आमिषास बळी पडू नये. अधिक माहिती हवी असल्यास आमच्या स्वयंसेवी कार्यकर्त्यांची मदत घ्यावी. शेवटी महत्त्वाचा एक मुद्दा म्हणजे रुग्णास रुग्णालयात दाखल केल्यानंतर संबंधित विमा कंपनीला कळवावे लागते. सध्या अशी परिस्थिती आहे की, कुटुंबांचा आकार लहान होत चालला आहे. पूर्वी कोणास रुग्णालयात दाखल केले तर काका, मामा, पुतण्या, भाचा असे कोणीतरी मदतीला असायचे. तशी परिस्थिती आता राहिलेली नाही.

# स्नेहरूपी चाफा



वय वाढल्याचं हक्कानं दाखवून देणारा दिवस म्हणजे वाढदिवस. वर्षभराचा सुखदुःखाचा जमा-खर्च मांडण्याचा दिवस म्हणजे वाढदिवस आणि त्यातून आपण काय कमावलं याचा सारासार विचार करण्याचा दिवस जो, थोडासा हसवून-रडवून भावनिक करून जातो. इस मतलबी दुनिया में फरिश्ते नजर आते है। गम भरी धुप में जो छाव बन जाते है।।

अशी सावली बनलेली काही माणसं, आपल्या भोवती वावरत असतात. कस्तुरीसारखी दरवळतात. चंदनापरी सुगंधित होतात. बोरी-बाभळींनाही सुवासित करणारा असा, प्रांजळ आहेस तू. कधी मैत्रीच्या प्रवाहात वाहत जाणारा. तर कधी एखाद्याला गुणदोषासह स्वीकारत मार्गावर आणणारा.

विसरतो कधी कधी आठवत नाही चेहरे.
संवादाची ऐशी तैशी,
दिवसामागून दिवस सरे
जशी उतरती कॅन्व्हासवर रंगबिरंगी फुलपाखरे
शुभेच्छात देते तुजला चाफ्याचे रंग गहरे.

शुभेच्छारूपी नजराणा तुला पेश करताना मनात हर्ष ओसंडून वाहतोय. येणारा प्रत्येक दिवस हा माझ्यासाठी विशेष असतो, तसा तो आजही आहे. चाफ्याच्या ओढीनं अनाहतपणे पाय ओढले गेले मंडईतल्या फूल बाजारात. तिथच तुला आवडणारा पिवळा गर्द चाफा डोकावून पाहत होता माझ्याकडे. त्याच्या पिवळ्या, हिरव्या देठातून तुझी आठवण जागी झाली. आज कागदावरील रेघोट्यात ते मांडण्याचा प्रयत्न करतेय, एवढंच काय ते विशेष. तुला ठाऊक आहे, कोणाला शुभेच्छा द्यायला फारसं कारण लागत नाही मला. उठता, बसता कविता पाझरतात मेंदूमध्ये, तेव्हा कुठं रित होण्यासाठी रितसर पद्धतीनं मोकळी होते मी. आणि त्याचवेळी शुभेच्छारूपी रचना प्रसवतात. एकेकाळी माझ्या कविता कोण आवडायच्या तुला. त्या ऐकवताना उगाचचं पाठ थोपवून घ्यायचे मी स्वत:ची. तेवढाच क्षणिक आनंद व्हायचा मला. हा आनंद मग चाफा देऊन साजरा करायचास तू. चाफ्याची पसाभर फुलं उधळायचास माझ्यावर. तुझी ही अशी खासियत आवडायची मला. खरं तर मोगरा, गुलाब तुझी आवडती फुलं, पण माझ्यासाठी रान गोळा करायचास. मग मीही रानवेडी, गंधवेडी व्हायचे.

केशर चाफा, शुभ्र मोगरा शिडकावे सौम्य सुगंधाचेग्रीष्माच्या स्वागताला सूर लागती कोकिळाचे


अशा अवस्थेत मन भरारी घ्यायचे. जाई, जुई, गुलाब, चाफा दरवळे गंध मनात. सोबत सरावं आयुष्य गुजगोष्टी करून खेळात.

खेळातली तुझी जीत सदैव ठरलेली असायची. तू नेहमीच राजा होऊन जगलास, यातच खरा आनंद होता. माझं चाफ्याचं वेड बालपणापासूनचं. कोकणातल्या आई-आजीच्या दारात आपल इवलंसं अस्तित्व दाखवतं. जाई, जुई, मोगरा, तगर, जास्वंद, या सगळ्यांत स्वत:चं वैशिष्ट्य सांगणारं हे खूज झाड. माझ्या अबोल-शांत स्वभावासारखंच म्हणूया हवं तरं. हिरव्या पानातून डोकावणारं.चाफा बोलेना, चाफा चालेना, चाफा खंत करी काही केल्या फुलेना

या गाण्याच्या अर्थाला समजून घेता, माझ्याबरोबर मोठा झालेला चाफा बहरताना पाहिलाय मी. त्याच्या दलातील टपोर सौंदर्य न्याहाळत लहानाची मोठी झाले मी. केशर चाफा, पांढरा चाफा तर कधी हळदुली रंगाचा मनमोहक चाफा, डोक्यात माळल्यावर रंगाचं दान देणारा. त्याचं असणं, दरवळणं जणू काही माझ्यात विरलेलं. कारण माझ्या अंतर्मनात दरवळलेला चाफा, तुझ्या येण्यानं बहरलेला. सुवासिक झालेला. आपली मैत्री फुलवणारा. कालांतराने मोगरा आवडतो हे तू विसरू लागलेला. त्यानंतर तू, मी, चाफा वेगळे उरलोचं नाही. पण एका वळणावर अनपेक्षित लाटेनं वाहून गेलं सारं. विसंवादाने चाफा हलला मुळासकट. मग जबाबदाऱ्यांच्या ओझ्यानं फुलांवरील हक्कही सोडलास तू.माझ्याकडे निव्वळ पाकळ्या उरल्या, त्या क्षणाला तेव्हापासून चाफ्याचा प्रतिशोध थांबवलाय मी. चाफ्यावर, तुझ्यावर लिहिता येईल बरंच काही. पण थांबवायला हवं स्वत:ला. लिहिताना उगाचच रडू आवरायचं नाही. भुरळ पाडणाऱ्या प्रितफुलातून, आपणही सुटलो नव्हतो. तू दिलेल्या वहीमध्ये दडवलेला; शेवटचा चाफा हीच माझी जीवलग आठवण. रंग बदलला जरी त्याचा तरी, तुझ्या आठवांच्या खुणा बाळगून आहे तो. मला जाणवतं आसपास त्याचं निर्मोही रूप. त्या रूपातला तू माझा कृष्णव्रत सखा.

ऐक ना!चाफा बोलत नाही काही, मागत नाही काही. बांधावर उभाच सूर्यकिरण खात अधीमधी. शेकवत बसतो अंग निगुतीनं जपलेल्या प्रितफुलांचं. त्याला ठाऊक असतं दरवळायचं. ठरल्या दिवशी फुलता फुलता व्यक्त व्हायचं. मग कधीतरी तूही सोडतोस बांध, फुलांना विखरण्यासाठी. पांढुरकी पिवळी फुलं साक्ष देतात तुझ्या अस्तित्वाची आणि तू बहरतोस सहस्त्र जाणिवांनी. चाफा उभाचं आहे, तिसरा होऊन आजही आपल्यात; पसरवत हिरव जाळं. हसतो तुझ्याकडे बघून तुझ्यात वसल्यासारखा आणि तूही खुलतो आहेस तुझ्या छबीमधून माझ्यावर जीव ओवाळून टाकल्यासारखा. पानाफुलांच्या गंधभरल्या शुभेच्छा तुजसाठी. कोणीतरी म्हटल्याचं आठवतं लपविलास तू पिवळा चाफा सुगंध त्याचा लपेल का? सुगंधाहूनी तरल अशी प्रीत तुझी छुपेल का? डबडबलेल्या डोळ्यांनी किनारा गाठलाय. आसवांचे मोती होण्याआधी मला आवरायला हवं, थोडं सावरायला हवं.-मोरपीस: पूजा काळे

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द
१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द
१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ-ेळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर
१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# खाजगी मालमत्तावरील होर्डिंग काढण्यासाठी रविवारची मुदत

लातूर/प्रतिनिधी: शहरात विविध ठिकाणी अवैध होर्डिंग लावण्यात आलेले आहेत.हे होर्डिंग्स रविवार दि.१९ मे पर्यंत काढून घ्यावेत अन्यथा मनपाच्या वतीने ते काढण्यात येऊन संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याचा इशारा मनपाच्या वतीने देण्यात आला आहे.

मुंबईत घाटकोपर येथील येथील घटनेच्या पार्श्र्वभूमीवर लातूर मनपाच्या वतीने दक्षता घेण्यात येत आहे.त्यामुळे मनपाने या सूचना केल्या आहेत.ज्या खाजगी मालमत्तांवर मोठमोठे होर्डिंग लावलेले आहेत ते होर्डिंग रविवार दि.१९ मे पर्यंत स्ट्रक्चरसहीत काढून घ्यावेत.सोमवारी असे होर्डिंग दिसून आले तर मालमत्ता धारक व एजन्सी धारकांवर क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून गुन्हा दाखल करण्याचा इशारा पालिकेने दिला आहे.

सार्वजनिक मालमत्तां वर लावण्यात आलेले होर्डिंगही तात्काळ काढून घेण्याचे निर्देश मनपाने दिले आहेत.ही होर्डिंग संबंधितांनी काढली नाहीत तर मनपाकडून ते काढले जातील.त्यासाठी होणारा खर्च संबंधित एजन्सी कडून वसूल करून एजन्सी धारकावर गुन्हा नोंद करण्यात येणार आहे.

कांही जाहिरात एजन्सीनी परवाना नूतनीकरणीसाठी मनपाकडे प्रस्ताव दाखल केलेले आहेत. त्यात त्रुटी असल्यामुळे असे प्रस्ताव निकाली काढण्यात आले आहेत.सद्यस्थितीत पालिकेकडे एकही प्रस्ताव प्रलंबित नाही.काही एजन्सीनी जाहिरात शुल्क भरल्याच्या पावत्या सादर केल्या आहेत परंतु त्या पावत्या जुन्या आहेत. संबंधितांच्या परवान्यांचे नूतनीकरण करण्यात आलेले नाही.त्यामुळे त्या होर्डिंग विनापरवाना असल्याचे स्पष्ट झाले आहे.

शहरातील मुख्य रस्त्यावर दुभाजकांमध्ये उभारण्यात आलेल्या युनिपोल बाबतही पालिकेकडे काही तक्रारी आल्या आहेत.या संदर्भात पालिकेने कंत्राटदारास नोटीस देऊन युनिपोलची साईज व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय/तंत्रनिकेतनचे स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट सादर करण्यास कळविले आहे.

अनेक ठिकाणी शासकीय कार्यालयाच्या जागांमध्ये होर्डिंग लावण्यात आले आहेत.हे होर्डिंगही तात्काळ काढून घेण्याचे निर्देश मनपाने दिले आहेत. होर्डिंगमुळे एखादी दुर्घटना किंवा अपघात होऊन विविध जीवित व वित्तहानी झाली तर संबधित शासकीय विभागाची जबाबदारी राहिल.

शहरात होर्डिंग उभा करावयाचे असतील तर त्यासाठी परवानगी घ्यावी असे मनपाने सूचित केले आहे.ज्या व्यावसायिकांना होर्डिंगसाठी परवानगी आवश्यक आहे त्यांनी जागा मालकाचे मालकाचा बांधकाम परवाना, बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र,१०० रुपयाच्या बाँडवर संमती पत्र,जागा मालकाने चालू वर्षाचा कर भरल्याची पावती, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय/शासकीय तंत्रनिकेतनचा स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट,होर्डिंगचे स्टील डिझाईन रिपोर्ट, मनपाचे क्षेत्रीय अधिकारी व क्षेत्रीय अभियंत्यांचा अहवाल व बेबाकी प्रमाणपत्र सादर करून पालिकेकडून रीतसर परवाना घ्यावा.

मनपाने केलेल्या सूचनांची दखल घेऊन संबंधितांनी अनधिकृत होर्डिंग तात्काळ काढून घ्यावेत.एखादी दुर्घटना झाली तर त्यासाठी संबंधित एजन्सी व मालमत्ताधारकास जबाबदार धरून सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येईल,असा इशारा पालिकेने दिला आहे.

शुक्रवार दि.१७ मे पर्यंत पालिकेने १६ होर्डिंग निष्कासित केल्या असून क्षेत्रीय कार्यालया मार्फत दोन गुन्हे नोंद करण्यात आले असल्याची माहिती मनपा उपायुक्त डॉ.पंजाब खानसोळे यांनी दिली.

# ग्रीन लातूर वृक्ष टीमची स्वच्छ्ता मोहिम




लातूर / प्रतिनिधी– स्वच्छ्ता मोहिम ग्रीन लातूर वृक्ष टीम सदस्यांनी आज मुख्य रस्त्यावरील तहसील कार्यालय समोरून लोकमान्य टिळक चौक पर्यंतचे संपूर्ण दुभाजक स्वच्छ करून त्या दुभाजकातून अंदाजे दोन गाड्या केरकचरा बाहेर काढला. यामध्ये प्रामुख्याने

दारूच्या बाटल्या, दुकानातील शिल्लक भंगार साहित्य, हॉटेलमधील शिल्लक अन्नधान्य, फळ दुकानांमधील कचरा, प्लास्टिकची आवरणे, प्लास्टिक पिशव्या इत्यादी साहित्यानी दुभाजक भरलेले होते.

यासोबतच ग्रीन लातूर वृक्ष टीम सदस्यांनी

दुभाजकातील झाडांना आळे केले, झाडांच्या छाटण्या केल्या, झाडांना आकार दिला.

दुभाजक म्हणजे कचराकुंडी हे समीकरण लातूर शहरात जवळपास सर्वमान्य झालेले आहे. कचरा आणायचा झाडांभोवती टाकायचा, दुभाजकात टाकून द्यायचा. दुभाजक कचऱ्याने भरभरून, ओसंडून जात आहेत, त्यातून दुर्गंधी येत आहे.

ग्रीन लातूर वृक्ष टीमचे सदस्य अखंडपणे अविरतपणे नियमितपणे महिन्यातून दोन–तीन वेळा शहरातील दुभाजक स्वच्छ करत असतात, मोठ्या प्रमाणावर घाण, मोठा केरकचरा त्यातून बाहेर काढत असतात.

ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या माध्यमातून लातूर शहराच्या नागरिकांना आवाहन करण्यात येते की घरामध्ये निर्माण झालेल्या कचरा कृपया दुभाजकात टाकू नका, आपलं शहर स्वच्छ, सुंदर, हरित, समृद्ध, आरोग्यदायी ठेवण्याकरिता मदत करा.

या माध्यमातून महानगरपालिका प्रशासनाला विनंती करण्यात येत आहे की, आपण लातूर शहरातील दुभाजकांची नियमितपणे स्वच्छता करावी, दुभाजकात कचरा टाकणाऱ्या दुकानदारांना समज द्यावी, प्रसंगी दंडात्मक कारवाई करावी.

लातूर शहरांमध्ये दुकानदारांकडे दैनंदिन जमा होणारा कचरा एकत्रित करण्याकरिता कचराकुंड्याच नसतात, कचराकुंड्या नसल्यामुळे दुकानदार तो कचरा इतरस्त फेकून देतात. प्रशासनाला विनंती आहे की आपण प्रत्येक दुकानदारांना कचराकुंडी किंवा कचरा पेट्या दुकानासमोर ठेवून त्यामध्ये कचरा एकत्रित करण्याकरिता बांधिल करावे नंतर महानगरपालिकेची घंटागाडी ती कचरापेटी उचलून त्यातील कचरा काढून घेइल.

शहरात कचऱ्याचे व्यवस्थापन योग्य रीतीने होत नसल्याने घरामध्ये दुकानदाराकडे जमा झालेल्या कचरा योग्य वेळी नियमितपणे उचलला जात नसल्यामुळे सगळीकडे कचरा साठलेला दिसून येत आहे प्रशासनाने यावरती अग्रक्रमाने भूमिका घेऊ शहर स्वच्छ करावे अशी मागणी ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या वतीने करण्यात येत आहे. आजच्या हा स्वच्छता उपक्रम पूर्ण करण्याकरिता ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या १५ सदस्यांनी सहभाग नोंदवला.

# डॉक्टरच पोटात घ्यायचा अर्भकांचा जीव अन् शेतात पुरायचा मृतदेह; संभाजीनगरातील रॅकेटचा पर्दाफाश

छ. संभाजीनगर, – संभाजीनगर शहरातील गारखेडा परिसरात सुरू असलेल्या अनधिकृत गर्भलिंग निदान केंद्रावर रविवारी म हानगरपालिकेच्या आरोग्य पथकाने छापा टाकून कारवाई केली होती. यावेळी एक इंजिनिअरिंग करणारी १९ वर्षाची तरुणी हा सर्व रॅकेट चालवत असल्याची बाब समोर आली होती. दरम्यान याच प्रकरणात आता अनेक धागेदोरे समोर येत आहेत. विशेष म्हणजे या प्रकरणात १५ ते २० एजंट्सचं जाळं असल्याची माहिती देखील समोर आली आहे.

संभाजीनगर शहरातील गारखेडा परिसरात सुरू असलेल्या अनधिकृत गर्भलिंग निदान केंद्रावर रविवारी म हानगरपालिकेच्या आरोग्य पथकाने छापा टाकून कारवाई केली होती. यावेळी एक इंजिनिअरिंग करणारी १९ वर्षाची तरुणी हे सर्व रॅकेट चालवत असल्याची बाब समोर आली होती. दरम्यान याच प्रकरणात पोलिसांकडून चौकशी सुरू असताना आता अनेक धागेदोरे समोर येत आहे.

डॉक्टरच पोटात घ्यायचा अर्भकांचा जीव गर्भलिंग निदानानंतर आरोपी तरूणीकडून गर्भपातासाठी सिल्लोड येथे महिलांना पाठवले जायचे. तर सिल्लोडच्या जय भवानीनगरमध्ये प्रसूतीगृह व स्त्रीरोग रुग्णालयाच्या नावाखाली आयुर्वेदिक डॉ. रोशन शांतीलाल ढाकरे हा राजरोस अर्भकांची पोटातच हत्या करत होता. पोलिसांनी आता त्याला देखील बेड्या ठोकल्या आहेत. विशेष म्हणजे या प्रकरणात १५ ते २० एजंटांचे जाळे असल्याची माहिती देखील समोर आली आहे.

धारदार ब्लेडचा वापर करत काढायचा गर्भ बाहेर

डॉ. रोशन ढाकरेपर्यंत पोहोचल्यानंतर हे रॅकेट उघडकीस आले. ढाकरेसह त्याला मदत करणाऱ्या चार कंपाउंडरांना अटक करण्यात आली. जिल्हाभरात १५ ते २० एजंटांचे जाळे पसरल्याचेही पोलिसांनी सांगितले. धक्कादायक म्हणजे ढाकरे अर्भकाचे मृतदेह शेतात पुरायचा. धारदार ब्लेडचा वापर करत गर्भ बाहेर काढले जायचे. चार तासांत गर्भपात महिलेला सोडले जायचे, अशी देखील माहिती येत आहे. पोलिस या रॅकेटचा तपास करत आहेत. ढाकरेकडे कोणताही गर्भपात केंद्राचा परवाना नव्हता. विशेष म्हणजे सिल्लोडच्या पोलिस स्थानक आणि जिल्हा रुग्णालयापासून एक किलोमीटर अंतरावर हा प्रकार सुरू होता.

रोज नवे खुलासे

विशेष म्हणजे शहरातील एका उच्चभ्रू वस्तीत एक इंजिनिअरिंग करणारी तरुणी गर्भनिदान केंद्र चालवत असल्याचा समोर आल्यानंतर शहरात एकच खळबळ उडाली होती. त्यानंतर रोज खुलासे होत आहेत.




लेबनॉनचे बेरूत येथे सुरू असलेल्या लेबनॉन इंटरनॅशनल सोलर वीकमध्ये एका व्यक्तीला चिनी उत्पादने दाखवत चिनी विक्रेता.

# नाशिकजवळ गोदान एक्सप्रेसच्या डब्याखालून धूर

नाशिक,१८ – रेल्वेतून प्रवासात अनेकदा लहान–मोठ्या घटना घडत असतात, आज नाशिक जिल्ह्याच्या इगतपुरी तालुक्यातील मुंढेगावजवळ गोदान एक्स्प्रेसच्या डब्याखालून अचानक धूर निघाल्याने प्रवाशांमध्ये गोंधळ उडाला होता. नाशिकहून म ुंबईकडे ही ट्रेन जात असताना अचानक ट्रेनच्या डब्याखालून धूर येत असल्याचे प्रवाशांच्या लक्षात येताच बोगीत गोंधळ उडाला होता. अप मार्गाच्या गोदान एक्स्प्रेसच्या बोगीच्या खाली असलेले लायनर ओव्हर हीट होऊन घासल्याने हा धूर निघत असल्याचे मॅकेनिकने गाडीची तपासणी केल्यानंतर लक्षात आले. त्यामुळे, रेल्वे मॅकेनिकच्या सल्ल्यानंतर गाडी इगतपुरी स्थानकावर नेण्यात आली होती. मात्र, या घटनेनंतर प्रवाशांमध्ये चांगलीच धांदल उडाली होती.

अचानक धूर सुरू झाल्याने प्रवाशांना मध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे, काही प्रवाशांनी गाडीची चैन ओढून रेल्वेच्या लोको पायलटला सावधान केले तर,काहींनी गार्ड व रेल्वे चालकास घटनेची माहिती दिली. याबाबत माहिती मिळताच, गार्ड आणि ट्रेन चालकाने प्रसंगावधान राखत जागेवरच गाडी थांबवली. त्यानंतर, गाडी थांबताच सर्व प्रवासी पटरीवर उतरले. यावेळी, ट्रेनमधून खाली उतरण्यासाठी प्रवाशांची मोठी घाईघडबड पाहायला मिळाली. आपल्या जीवाच्या आकांतेने सर्वजण ट्रेनमधून खाली उतरण्यासाठी धडपडत असल्याचं व्हिडिओत दिसून येत आहे. प्रवाशांनी ट्रेनमधून खाली उड्या घेत स्वत:ची सुटका करण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, गाडी इगतपुरी स्थानकात आल्यानंतर गाडीची बोगी लायनर दुरुस्त करुन पुन्हा मुंबईच्या दिशेने ट्रेनला रवाना करण्यात आली आहे. त्यामुळे, प्रवाशांनी सुटकेचा निश्वास टाकला.



इंडोनेशियातील सेंट्रल सुलावेसी, सिगी रिजन्सी येथील पोरामे गावात शेतातून मिरचीची कापणी करताना एक महिला शेतकरी.

# भरदिवसा मास्क लावून आले हाणामारी केली अन् सोन्याचे दुकान लुटले

पुणे,१८ – पुण्यात मागील काही दिवसांपासून पुण्यात चोरीच्या घटना समोर आल्या आहेत. अनेकदा चोरीच्या घटना समोर आल्याने अनेक परिसरात दहशतीचं वातावरणदेखील पाहायला मि ळालं होतं. मात्र आता पुण्यात भर दिवसा बीजेएफ ज्वेलर्सच्या दुकानात सशस्त्र दरोडा टाकण्यात आल्याची घटना समोर आली आहे. वानवडी हद्दीतील वाडकर मळ्याशेजारी हे ज्वेलर्स आहे. या ठिकाणी हा दरोडा टाकण्यात आला आहे. सात जण मिळून हा दरोडा टाकला आहे. भरदिवसा टाकण्यात आलेल्या दरोड्यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

साधारण दुपारी १२ च्या सुमारास दरोडेखोर मास्क लावून आले आणि त्यांनी दुकानदाराला धाक दाखवायला सुरुवात केली. शस्त्राचा धाक दाखवला आणि थेट दरोडा टाकला. मास्क लावून आले आणि त्यांनी दुकानातील तब्बल ३०० ते ३५० ग्रॅम सोन्याचे दागिने लंपास केले. चोरांनी सगळे दागिने लंपास केले आणि थेट दुचाकीवरुन फरार झाले. ही घटना कळताच पोलीस ज्वेलर्समध्ये दाखल झाले आहेत आणि सर्व तपास करत आहेत. या सगळ्या घटनेचा पंचनामा पोलीस करत आहेत. सीसीटीव्हीदेखील पोलीस तपासत आहे. दुकानातील सिसिटीव्ही देखील तपासण्यात येत आहे. सीसीटीव्हीत दोन दरोडे खोरांनी बंदुकीचा धाक दाखवून दुकान लुटले आहे. घटनास्थळी डीसीपी आर राजा, सपोआ इंगळे यांच्यासह स्थानिक पोलीस अधिकारीदेखील पोहोचले आहेत. या दुकानातून साधारण ७ अनोळखी इसमांनी मास्क लावून बीजेएफ ज्वेलर्समधून ३०० ते ४०० ग्राम सोन्या चांदीचे दागिने लुटले आहे. काहीच दिवसांपूर्वी पुण्यात एका सराफ्याच्या दुकानात दुकानदाराची नजर चोरून जबरी चोरी करण्यात आली होती. येरवडा भागात असलेल्या सराफा दुकानात ६ जणांनी चोरी केली होती महत्वाचं म्हणजे दुकानदाराचे लक्ष विचलित करून चोरी केली होती. महावीर ज्वेलर्स असे येरवडा भागात असलेल्या सराफ दुकानाचे नाव होते. या दुकानातून चोरट्यांनी लंपास ३७२ ग्रॅमचे दागिने लंपास केले होते. ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली होती. येरवडा पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता.





उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०

दररोज ४ शो




उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर–४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५–२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!

अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ
डॉ.अंकिता लाहोटी (DOMS)
डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.)
डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष
व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर
लॉ. प्रदिप बेद्रे सचिव



# लातूरातील बहुआयामी व्यक्तिमत्व म्हणजे थोर स्वातंत्र्य सेनानी जीवनधर शहरकर गुरुजी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई



लातूर / प्रतिनिधी- लातूरातील ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक, तत्वनिष्ठ पत्रकार, आदर्श शिक्षक, समाजवादी विचार असलेले उत्तुंग व्यक्तिमत्व, हाडाचे आदर्श शिक्षक, गांधी विचाराचे कृतिशील व्यक्तिमत्व आणि ज्येष्ठ नागरिक जीवनधर शहरकर गुरुजी यांचे नुकतेच वृद्धापकाळाने वयाच्या ९७व्या वर्षी निधन झाले. त्यांचे व्यक्तिमत्व बहुआयामी होते असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केले.

जयंती उत्सव समिती व कार्यालय, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने जीवनधर शहरकर गुरुजी यांचा सामूहिक श्रद्धांजली कार्यक्रम प्राचार्य कक्षामध्ये आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते आपल्या भावना व्यक्त करताना बोलत होते. यावेळी उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांच्यासह कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. संजय गवई म्हणाले की, जिवनधर शहरकर गुरुजी यांच्या निधनाचे वृत्त म्हणजे शहरातील पत्रकार, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मोठी पोकळी आहे. ही पोकळी भरून काढण्यासाठी आपण सर्वांनी त्यांच्या विचाराचा आदर्श घेऊन त्याप्रमाणे आपले वर्तन ठेवावे अशी भावना सुद्धा त्यांनी व्यक्त केली. यावेळी डॉ. बाळासाहेब गोडबोले आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले की, त्यांच्या निधनाने लातूर शहर हे पोरके झाले आहे. ते एक चालते बोलते आचार आणि विचारांमध्ये समानता असलेले आदर्श व्यक्तिमत्व होते. त्यांनी संपूर्ण आयुष्यामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या विचारांची प्रत्यक्ष व्यवहारात अंमलबजावणी केली. आजच्या युवकाला आदर्शवत ठरेल असे त्यांचे निरोगी आणि निरामय आरोग्य होते. आज त्यांच्या जीवनशैलीची नव्या पिढीने आदर्श घेऊन त्या पद्धतीने वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांनी केले व सर्वांच्या सामूहिक श्रद्धांजलीने हा कार्यक्रम संपला.

# लातूरात खाजगी बसने दोन मोटारसायकल चालकास चिरडले





लातूर दि १८ मे ओव्हरटेक करण्याच्या गडबडीत खाजगी बस चालकाने स्वामी विवेकानंद पोलीस ठाण्याअंतर्गत असलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथे दि १८ मे रोजी सकाळी ०७ वाजण्याच्या सुमारास दोन मोटारसायकल चालकास धडक देत खाजगी बसच्या समोरील टायरखाली एका मोटारसायकलला चिरडले तर दुसर्या मोटारसायकलला समोरील बाजूने ठोकरले यात एकास डोकाला गंभीर मार लागला असुन रुग्णालयात उपचार सुरु असल्याची माहिती स्थानिकांकडून मिळत आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत असलेले रामदास पंढरी ताकपडे वय २६ राहणार मोळवण ता अहमदपूर सध्या हरिभाऊ नगर लातूर हे आपली रात्रपाळीचे काम संपवून डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथे दुध घेण्यासाठी एम एच २४ ए आर ५१०६ होंडा कंपनिची मोटारसायकल थांबले असताना पुणे- अहमदपूर- लोहा- कंधार जाणारी समोर राजधानी नाव लिहलेली एम एच ०४ जी एफ ६६६९ खाजगी बस दुसर्या खाजगी बसला ओव्हरटेक करत या मोटारसायकल ला धडक देऊन चिरडली तर समोरच चौकात वळण घेऊन बौद्ध नगर येथे वळत असलेले महादेव कांबळे वय अंदाजे ५५ हे त्यांच्या मोटारसायकल क्रमांक एम एच २४ ए सी ९०६३ वरुन जात असताना या बसने ठोकरले आहे. यात महादेव कांबळे यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याचे स्थानिकांकडून समजते तर त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहे.

# प्रकाश सोनकांबळेच्या कुटुंबियांना महावितरणतर्फे ४ लाखांची मदत



लातूर /प्रतिनिधी- लातूर तालुक्यातील बाभळगाव येथील महावितरण उपकेंद्रात लाईटच्या ताराला चिटकून गावातील तरुण प्रकाश उर्फ (बाळू) सोनकांबळे यांचा विजेचा शॉक लागून दुदैवी मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित देशमुख यांनी अपघाताची माहीती घेतली, गावातील सोनकांबळे कुंटूबियातील या दुदैवी घटने बद्दल दुःख व्यक्त केले होते, तसेच सोनकांबळे कुंटूबियाना शासनाकडून जास्तीत जास्त आणि लवकरात लवकर आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासनही दिले होते.

महावितरण कार्यालयाने तातडीने दखल घेऊन ४ लक्ष रु धनादेश प्रकाश उर्फ (बाळू) सोनकांबळे यांच्या पत्नी सुवर्णा सोनकांबळे यांना सुपुर्द केला. यावेळी लातूरचे तहसिलदार सौदागर तांदळे, महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता अरुण गायकवाड, सहाय्यक अभियंता एल.पी.बाचे, महावितरणचे अधिकारी गंगाधर भाडूळे, गजानन लव्हराळे, उपसरपंच गोविंद देशमुख, ग्रामविकास अधिकारी शंकर भोसले, ग्रा.प.सदस्य ड.कैलास मस्के,पोपट अवघडे,सचिन मस्के, नवनाथ मस्के, कोतवाल शिवलिंग थडकर, बबलु गवळी, ग्रामपंचायत कर्मचारी दिगंबर यामजले,परमेश्वर मस्के,भरत सावळे,आशु स्वामी, मिनाबाई कांबळे, सुरेश सोनकांबळे, लालासाहेब सोनकांबळे आदींसह नागरिक उपस्थित होते.

# अतिक्रमणाच्या कारवाईवरुन महायुतीत खडाजंगी; पांडे – खोपडे वादात आता भाजप शहराध्यक्षांची उडी

नागपूर, – राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नेत्या आभा पांडे यांनी भाजप नेत्यांबद्दल अवमान कारक वक्तव्य करू नये आणि त्यांनी आपला प्रभाग सोडून भाजप आमदार कृष्णा खोपडे यांच्या पूर्व नागपूर मतदारसंघात ढवळाढवळ ही करू नये, असा थेट इशारा भाजपचे शहर अध्यक्ष बंटी कुकडे यांनी दिला आहे.

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नगरसेविका आणि राज्य महिला आयोगाच्या सदस्या आभा पांडे यांनी पूर्व नागपूरचे भाजपचे आमदार कृष्णा खोपडे यांच्यावर लावलेले सर्व आरोप निराधार असून हा केवळ राजकीय पोळी भाजण्याचा प्रकार असल्याचे मतही भाजपचे शहर अध्यक्ष बंटी कुकडे यांनी व्यक्त केले आहे. त्यामुळे आता अतिक्रमण विरोधी कारवाईच्या मुद्द्यावरून नागपुरात महायुतीच्या दोन नेत्यांमध्ये चांगलीच जुंपल्याचे चित्र असून यात भाजपकडून देखील आता जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले आहे.

अतिक्रमण विरोधी कारवाईचा वाद शिगेला

राज्यात लोकसभेच्या निवडणुका अद्याप संपलेल्या नाहीत. मात्र त्यापूर्वीच उपराजधानी नागपुरात महायुतीच्या दोन पक्षांमध्ये चांगलीच जुंपल्याचे पाहायला मिळत आहे. भाजप आमदार कृष्णा खोपडे यांच्या विरोधात त्याच मतदारसंघातील राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाच्या नगरसेविका आभा पांडे यांनी जोरदार मोर्चा उघडला होता. दोघांमधील वादाला कारण ठरले आहे ते रस्त्यांच्या मधोमध असलेल्या एक अतिक्रमणाविरोधात झालेली कारवाईचे आणि त्यानंतर जवळच्या एका हनुमान मंदिर आणि बौद्ध विहाराला अतिक्रमणासंदर्भातच मिळालेली नोटीसचे.

या वादात आता दोन्ही बड्या नेत्यांकडून अनेक आरोप-प्रत्यारोप आणि टीकेचा फैरी झाडल्या जात आहे. त्यामुळे निकालापूर्वीच नागपुरात महायुतीत दोन नेत्यांमधील हा वाद राजकीय वातावरणात चर्चेचा विषय ठरला आहे. अशातच आता नगरसेविका आभा पांडे यांना भाजपकडून देखील जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले आहे महायुतीच्या दोन नेत्यांमध्ये जुंपली आभा पांडे यांनी कालच वाठोडा परिसरातील हनुमान मंदिर आणि बौद्ध विहाराला मिळालेल्या अतिक्रमणाच्या नोटीसीच्या मुद्द्यावरून कृष्णा खोपडे यांच्यावर गंभीर आरोप करत आंदोलन सुरू केले होते. आमदार कृष्णा खोपडे त्यांच्या कार्यकर्त्याच्या रस्त्यावरील अतिक्रमणाच्या विरोधात झालेल्या कारवाईचा राग परिसरातील हनुमान मंदिर आणि बौद्ध विहारावर काढत असल्याचा पांडे यांचा आरोप होता. नागपूर सुधार प्रन्यासने काही दिवसांपूर्वी वाठोडा परिसरात रस्त्यावर असलेलं एक अतिक्रमण काढलं होतं.

त्याचाच राग धरून कृष्णा खोपडे यांनी अधिकाऱ्यांवर दबाव आणून परिसरातील हनुमान मंदिर आणि बौद्ध विहाराला अतिक्रमणाची नोटीस पाठवल्याचा पांडे यांचा आरोप होता. काल आभा पांडे यांनी परिसरातील काही नागरिकांच्या मदतीने नोटीस मिळालेल्या हनुमान मंदिर आणि बौद्धविहारसमोर ठिय्या आंदोलनही केले होते. आमच्या नेत्यांबद्दल अवमानकारक बोलू नये- बंटी कुकडे

महायुतीतील मित्रपक्षाच्या महिला नेत्याने भाजप आमदारावर गंभीर आरोप केल्यानंतर आता भाजपनेही पलटवार केला आहे. आमच्या नेत्यांबद्दल अवमानकारक बोलू नये आणि आपल्या प्रभागाचे काम सोडून कृष्णा खोपडे यांच्या मतदारसंघात ढवळाढवळ करू नये असा इशाराच भाजपने दिलाय. यामुळे महायुतीतील दोन मित्रपक्षाच्या नेत्यांमध्ये सुरू झालेला कलगीतुरा भविष्यात नागपुरात महायुतीतील नेत्यांची डोकेदुखी वाढवण्याची शक्यता आहे.

# दयानंद शिक्षण संस्थेतर्फे उन्हाळी व्हॉलीबॉल मोफत प्रशिक्षण शिबिर

लातूर : येथील दयानंद शिक्षण संस्थेतर्फे दि.२०-०५-२०२४ ते २०-०६-२०२४ या दरम्यान मुलींचे व्हॉलिबॉलचे मोफत प्रशिक्षणचे आयोजन करण्यात आलेले आहे.या प्रशिक्षणाचा लाभ वर्ग १० वी पासून ते पदवीच्या विद्यार्थांना घेण्यात येईल.या प्रशिक्षणा दरम्यान योग्य त्या सोयीसुविधा पुरविण्यात येतील.१० वी व १२ वी विद्यार्थ्यांना क्रीडास्पर्धा पारितोषिक विद्यार्थ्यांना बोर्डाकडून गुण मिळतील.

इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रा.वैष्णवी जोशी यांच्याशी ८२७५१७४८४८ या मोबाईल नंबरवर संपर्क साधून योग्य ते मार्गदर्शन घ्यावे.

सदरील प्रशिक्षण शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी,सचिव रमेशजी बियाणी,दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड, दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजाराम पवार,क्रीडा विभाग प्रमुख डॉ.महेश बेंबडे,प्रा.निशिकांत सदाफुले,डॉ.अशोक वाघमारे, डॉ. नितेश स्वामी,प्रा.वैष्णवी जोशी व प्रा.सौरभ जांभळे आदिंनी केले आहे.

**CHANGE IN NAME**

I have change my name from SIDHDIKABANU to SHATTARI SIDDIQUA BANU ABDUL BASIT hence from this decleration and will be known by this name I will use SHATTARI SIDDIQUA BANU ABDUL BASIT in future the same name will be used by my wife children and family.

**OLD NAME**
SIDHADIKABANU
**NEW NAME**
SHATTARI SIDDIQUA BANU ABDUL BASIT
**ADDRESS**
Kole Galli, At- Post & Tq- Nilanga Dist- Latur M.S. 413521

**CHANGE IN NAME**

I have change my name from SHATTARI A BASIT to SHATTARI ABDULBASIT ABDULHAMID hence from this decleration and will be known by this name I will use SHATTARI ABDULBASIT ABDULHAMID in future the same name will be used by my wife children and family.

**OLD NAME**
SHATTARI A BASIT
**NEW NAME**
SHATTARI ABDULBASIT ABADULHAMID
**ADDRESS**
Shattari Niwas, Behind the Post Office, At Post & Tq. Nilanga Dist. Latur (M.S.)-413521

**CHANGE IN NAME**

I have change my name from SAYEDA MUSHTAQUE HUSSAIN to SYED MUSHTAQ HUSAIN SYED IFTEKHAR HUSA hence from this decleration and will be known by this name I will use SYED MUSHTAQ HUSAIN SYED IFTEKHAR HUSAIN future the same name will be used by my wife Children and family.

**OLD NAME**
SAYEDA MUSHTAQUE HUSSAIN
**NEW NAME**
SYED MUSHTAQ HUSAIN SYED IFTEKHAR HUSAI
**ADDRESS**
Azad Nagar, Parli Vaijanath Dist. Beed (M.S.) 431515

# मुख्याध्यापक गणेश सावळकर यांना रोटरीचा क्लब लातूरच्या वतीने जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार



लातूर /प्रतिनिधी- रोटरी क्लब लातूर यांच्या वतीने दिला जाणारा नॅशनल बिल्डर अवॉर्ड जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हाकेतांडा .

तालुका रेणापूर शाळेचे मुख्याध्यापक गणेश राणबा सावळकर यांना ज्येष्ठ विचारवंत मा. प्राचार्य नागोराव कुंभार सर, अॅड. जांबुवंतराव सोनकवडे साहेब यांच्या हस्ते , सचिव रो महेंद्र जोशी, प्रकल्प प्रमुख प्रविण होळीकर, समस्त ककया महासंघाचे लातूर जिल्हाध्यक्ष श्रीमंत कावळे यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी सहशिक्षक जाकीर शेख सर, रो बस्वराज उटगे,रो.सतिश बोरारो सुरेश पेंन्सलवार,रो सुधाकर कोडगिरे. रो. राजकुमार गिरवलकर,रो. डॉ.सौ अर्चना लड्डा,रो सौ.अनंदा कोचेटा,रो सौ कौशल्यादेवी सोनकवडे, , विजय व्हसाळे,विजयकुमार रसाळ व इतर मान्यवर उपस्थित होते.पुरस्कार मिळाल्या बद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.एन.जे.चव्हाण, ३ थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३१५/२०२४ निशाणी क्र.०७

ज्याअर्थी नामे Shivmurti S/0. Baslingappa Idalgave हे दिनांक ०५/०२/२०२२ रोजी At Somnathpur Tq Udgir Dist. Latu, येथे मयत झाले आहेत. व अर्जदार
1) Sangamma W/o. Shivmurti Idalgave.
Age 70 years, Occup. Household.
2) Rajkumar S/o. Shivmurti Idalgave.
Age 49 years, Occup. Business.
Applicant
यांनी खालील नमुद २ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असुन,

| Sr.no | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 01 | Sangamma W/o. Shivmurti Idalgave | 70 | Wife |
| 02 | Rajkumar S/o. Shivmurti Idalgave | 45 | Son |

अर्जदार याने Shivmurti S/0. Baslingappa Idalgave या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्याअर्थी सदरहु वारसदार सदरहु मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु Shivmurti S/0. Baslingappa Idalgave यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १७/०५/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील तारीख १४/०६/२०२४

(डी.ए.कांबळे)
कनिष्ठ लिपीक
३ रे सहदिवाणी न्यायालय,
क.स्तर उदगीर

(एस.एम.शेटे)
सहायक अधिक्षक
सहदिवाणी न्यायालय,
क.स्तर उदगीर

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.बी.आर.झेंडे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३१६/२०२४ निशाणी क्र.०७

ज्याअर्थी नामे Bhimrao Malhari Suryawanshi हे दि. २९/०९/२०२१ रोजी Govt. Medical College, Latur, Dist-Latur , येथे मयत झाले आहेत. व अर्जदार
1) Gokul Bhimrao Suryawanshi, Age: 38 Occu: Labour,
Applicant R/o Yenki, Tal- Udgir, Dist-Latur
यांनी खालील नमुद ५ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असुन,

| Sr. no | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 01 | Gajrabai Bhimrao Suryawanshi | 58 | Wife |
| 02 | Gokul Bhimrao Suryawanshi | 38 | Son |
| 03 | Anand Bhimrao Suryawanshi | 34 | Son |
| 04 | Govind Bhimrao Suryawanshi | 31 | Son |
| 05 | Gopal Bhimrao Suryawanshi | 30 | Son |

अर्जदार याने Bhimrao Malhari Suryawanshi या मयताचे वारसाचे प्रमापत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्याअर्थी सदरहु वारसदार सदरहु मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु Bhimrao Malhari Suryawanshi यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १४/०५/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील तारीख १८/०६/२०२४

(ए.बी. सुर्यवंशी)
कनिष्ठ लिपीक
४ थे सहदिवाणी न्यायालय,
क.स्तर उदगीर

(एस.एम.शेटे)
सहायक अधिक्षक
४ थे सहदिवाणी न्यायालय,
क.स्तर उदगीर

## जगत् जागृति शिक्षण प्रसारक मंडळ, चाकूर.

ता. चाकूर. जि. लातूर 413513

**कामाचे दरपत्रक (कोटेशन) मागणी सूचना**

जगत् जागृति शिक्षण प्रसारक मंडळ, चाकूर ता. चाकूर जि. लातूर द्वारे संचलित, साने गुरुजी छात्रालय, चाकूर येथे छात्रालयातील विद्यार्थ्यांकरीता लोखंडी बंक बेडवररती खालील तपशीलाप्रमाणे गादी बनविण्याकरीता दरपत्रक (कोटेशन) मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुकांनी आपापले कोटेशन दिनांक. 25/05/2024 पर्यंत संस्था कार्यालयात सादर करावेत. आपापल्या कोटेशनचे दर हे जी.एस.टी. समाविष्ट करुन देण्यात यावेत.

| अ.क्र. | तपशील | साईज | नग | दरपत्रक (कोटंशन) सादर करावयाचा अंतिम कालावधी |
|---|---|---|---|---|
| 01 | 2 इंच हिटलॉन व 1 इंच स्पंज रेग्झीन कव्हरसह | 2.6 फुट x 6.0 फुट | 42 | दिनांक.25/05/2024 दूपारी 04.00 पर्यंत |

2. अधिक माहीतीसाठी इच्छुक कोटेशन देणार यांनी संस्था कार्यालयाशी संपर्क साधावा.
3. जगत् जागृति शिक्षण प्रसारक मंडळ, चाकूर यांनी कोटेशनमधील संख्या कमी/अधिक करण्याचे आणि कोणतेही कारण न देता कोटेशन नाकारण्याचे अधिकार स्वत:कडे राखुन ठेवलेले आहेत.

**सचिव,**
जगत् जागृती शिक्षण प्रसारक मंडळ, चाकूर

**लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना**

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.





यशवंत

रविवार दि. १९ मे २०२४

उदगीर

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३१९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# पारायणातून मन परिवर्तनाचे कार्य घडते :डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य

## काशी जगद्गुरूंच्या आशीर्वाचनासाठी उदगीरात लोटला जनसागर

**(राम मोतीपवळे )**

उदगीर (प्रतिनिधी) : धार्मिक ग्रंथांतील प्रत्येक ओवीचा, श्र्लोकाचा अर्थ समजून घेऊन त्याचे पारायण केल्यास याच जन्मात मुक्ती मिळते. पारायणातून साधक आपल्या अनिर्बंध मनाला एका सूत्रात बांधून नियंत्रित करू शकतो. पारायण ही आत्मज्ञान प्राप्ती करून देणारी पहिली पायरी असून पारायणामुळे आपले मानसिक आरोग्य चांगले राहते. पारायणातून चित्तवृत्ती प्रफुलित होते पारायण हे मन परिवर्तनाचे आश्र्वासक साधन आहे, असे मौलिक विचार काशी पिठाचे जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी उदगीर येथील वीरशैव-लिंगायत धर्म महासभेत केले. श्री सद्गुरू हावगीस्वामी मंदिर सुवर्ण कलशारोहण सोहळा निमित्त बिदर रेल्वे गेट जवळील हावगीस्वामी शेतमळा येथील भव्य जागेत अखंड शिवनाम सप्ताह परमरहस्य ग्रंथाचे पारायण शिवपाठ, गाथा भजन आदी कार्यक्रमाच्या सहाव्यादिवशी आयोजित धर्मसभेत काशीपीठाचे जगदगुरु डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजीनी भक्तांना अमृतोपदेश केला.

व्यासपीठावर ष.ब्र. सिध्देश्र्वर शिवाचार्य आळंद ,जयशांतलिंगेश्र्वर महास्वामीजी हिरणगावा,सिध्दलिंग महास्वामी देवणी,चन्नमल्ल महास्वामी हुडगी,औकार शिवाचार्य महाराज जगंमवाडी,पंडिताराध्य शिवाचार्य हळीखेड,शिवानंद महास्वामी सायगाव,उमाकांत देशिकेंद्र महाराज डोणगाव आदी शिवाचार्यगण,शंकरलिंग मठाचू सुखदेव स्वामी ,माजी जि.प.उपाध्यक्ष राहुल केंद्रे,उत्तरातिई कलबुर्गे, चंद्रकांत टंगेटोल,साईनाथ चिमेगावेअजित शिंदे ,श्रीमती विमलताई गर्जे आदी उपस्थित होते.



प्रारंभी अजय गंगाधर मुगडे यांच्या हस्ते जगदगुरुंची पाद्दपुजन करुन जगदगुरुंचे मठसंस्थानच्या वतीने स्वागत करण्यात आले.डॉ.शंभुलिंग शिवाचार्य महाराजांनी उपस्थितांचे स्वागत करुन कळसारोहण सोहळ्या निमित्य आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य शिबिरात सेवा केलेले डॉक्टर मंडळी, नागप्पा अंबरखाने ब्लड बॅकेच्या सर्व टिमचे आभार मानले .

जगदगुरु डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीनी आपले अमृतवाणीतून गोड चिंतन मांडताना महाकवी कालिदास यांचे वचन उद्धृत करून स्वामीजी पुढे म्हणाले की, संतांना सामान्य जनांचा कळवळा असतो. महाराष्ट्राच्या पुण्यभूमीत मन्मथ स्वामींच्या रूपाने साक्षात परब्रह्म शिवाने अवतार घेऊन फार मोठे संत त्यांच्या रुपाने जन्माला घातले आणि पुढे याच अवतारी संत महात्म्याने महाराष्ट्रात अलौकिक कार्य केले. ग्रंथराज परमरहस्य मालामंत्र असून जपाने पुण्य मिळते, इहलोकात आपल्याला सुखी जीवन जगता येते. श्रद्धायुक्त अंतकरणाने अर्थाचे चिंतन करत पारायण केल्यास ज्ञानप्राप्ती होते, आत्मबोध होतो असेही स्वामीजी म्हणाले.

## सुवर्ण कलशयात्रा

**श्रीगुरु हावगीस्वामी मंदिर सुवर्ण कळस सोहळा निमित्य आज रविवार दि.१९ मे रोजी सायंकाळी ठिक ७ वाजता श्री हावगीस्वामी शेतमळा बिदर रेल्वेगेट कार्यक्रम स्थळापासुन काशीपीठ जगदगुरु डॉ.चंद्रशेख शिवाचार्य महास्वामीजी यांची व सुवर्ण कळस भव्यशोभा यात्रा निघणार असुन हि शोभा यात्रा छत्रपती शाहू महाराज चौ, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पोलिस स्टेशन, पत्तेवार चौक, कै.अशोकदादा पुदाले चौक, वीरशैव समाज, आर्यसमाज, चौबारा मार्गे श्री गुरु हावगी स्वामी मंदिर येथे या शोभा यात्रेचा समारोप होणार आहे .तर सोमवार दि २०मे रोजी सकाळी ठिक १० वाजता काशी जगदगुरु डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांचे शुभ हस्ते वेदमंत्रोच्चारात कळसारोहण संपन्न होणार आहे. या शोभायात्रेत विविध भजनी मंडळ कलशधारी सुवाशीनी महिला वेषभुषेत सहभागी होणार आहेत.संचलन विरभद्र स्वामी यांनी तर आभार शि.भ.प. शिवराज नावंदे यांनी मानले.**

सुवर्ण कळस हे निमित्य असुन भक्ताच्या मस्तकावर ज्ञानाचा कळस ठेवणे हा मुळ कार्यक्रमाचा उद्देश असल्याचे सांगून नेत्रदान दान रक्तदान हे सर्व श्रेष्ठ दान असुन रक्तदान वैज्ञानिक दान श्रेष्ठदान असुन रक्तदान करुन रक्तदानाच्या महान कार्यात सहभाग घेणार्या रक्तदात्यांचे अभिनंदन करुन मोफत सर्व रोगनिदान शिबिरात सेवा देणार्या डॉक्टर मंडळींचे अभिनंदन केले. या प्रसंगी आळंद मठाचे मठाधिश ष.ब्र.सिध्देश्र्वर शिवाचार्य यांचे आशिर्वचन झाले. यावेळी महाराष्ट्र कर्नाटक आंध्र,तेलंगणा राज्यातून हजोरो महिला पुरुष शिवभक्त उपस्थित होते.

## श्री हावगीस्वामी मंदिर कळसारोहणनिमित्य आयोजित रक्तदान शिबिरात ५१ रक्तदात्यांचे योगदान



उदगीर (प्रतिनिधी श्री हावगीस्वामी मंदिर कळसारोहणनिमित्य आयोजित रक्तदान शिबिरात ५१रक्तदात्यांचे योगदान रक्तदान करुन रक्तदानाच्या सामाजिक राष्ट्रिय कार्यात सहभाग नोंदवला तर यात महिलांचा उत्सफुर्त सहभाग नोंदवला.

सद्गुरू हावगीस्वामी मंदिर सुवर्ण कलशारोहण सोहळा निमित्त बिदर रेल्वे गेट जवळील हावगीस्वामी शेतमळा येथील भव्य जागेत अखंड शिवनाम सप्ताह निमित्य विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मठाचे मठाधिश डॉ.शंभूलिंग शिवाचार्य महाराज यांनी सध्या उन्हाळा असल्याने रक्ताची मागणी वाढली आहे परंतू ब्लड बँकेत रक्ताचा तुटवडा असल्याने धार्मिकते बरोबरच

सामाजिक जाणावीने कै. नागप्पा अंबरखाने ब्लडबँकेच्या सहकार्याने शनिवार दि.१८ मे रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उदघाटन ष.ब्र. सिध्देश्र्वर शिवाचार्य महाराज, म.नि.प्र संगनबसव महास्वामी निलंगायांच्या हस्ते झाले यावेळी नागप्पा ब्लड बँकेचे डॉ.सिद्राम शेटकार उपस्थित होते. या रक्तदान शिबिरात हावगीस्वामी युवक मंडळाचे युवक, तसे चया शिबिरात महिला शिवभक्तांनी उत्सफुर्तपणे रक्तदान करुन महिलाही रक्तदानात मागी नाहीत हे दाखवून दिले आहे.



## डॉ.शंभुलिंग शिवाचार्य महाराजांची साखरतुला

उदगीर (प्रतिनिधी) ष.ब्र.डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराजाची महिला शिवभक्तांच्यावतीने साखरतुला करण्यात आली.

श्री गुरु हावगीस्वामी मंदिर सुवर्ण कळसारोहण निमित्य बिदर रेल्वेगेट उदगीर येथील श्री हावगीस्वामी शेतमळा येथील भव्य जागेत १९मे पासुन शिवनाम सप्ताह,परमरहस्य ग्रंथाचे पारायण ,प्रवचन,शिवपाठ रिंगण सोहळा व किर्तन सोहळ्याचे यशस्वी आयोजन करुन परिसरातील शिवभक्तात नवचैतन्याचे निर्माण केल्याबद्दल श्री गुरु हावगीस्वामी मठाचे मठाधिश ष.ब्र.डॉ. शंभुलिंग शिवाछार्य महाराज यांचे हावगीस्वामी महिला मंडळाच्यावतीने साखरतुला करण्यात आली.

यावेळी शिवानंद महास्वामी हुलसुर, हावगीलिंगेश्र्वर शिवाचार्य शिवणी, शिवानंद महास्वामी सायगाव, निळकंठ शिवाचार्य महाराज मादन हिप्परगा, प्रभुशांतलिंगेश्र्वर महास्वामी हत्तीकनमुच,बस्वलिंगमहास्वामी अक्कलकोट ,सिध्दलिंग महास्वामी देवणी,सिध्दऔमेश्र्वर शिवाचार्य महाराज जंगमवाडी,संगबस्व महास्वामी निलंगा आदी शिवाचार्य गण तसेच लिंगायत महासंघाचू अध्यक्ष सुदर्शन बिरादार,चंद्रकांत सिरसे आदी उपस्थित होते.

हावगीस्वामी महिला मंडळाचे श्रीमती लक्ष्मिबाई पांढरे, माजी नगरसेविका श्रीमती रेखाताई कानमंदे,शंकुंतला समगे, श्रीदेवी खंदारे,सुनिता मठपती,ज्योती समगे, प्रेमला समगे, ताराबाई मोदी,सविता समगे,सुरेखा समगे,कलावती आठाणे, कल्पना कानमंदे, सुरेखा मोदे,प्रेमला खंदारे,शिवमाला समगे, जगदेवी स्वामी, रेष्मा कापसे, कस्तुरा समगे,सुभद्रा कुंभार,शरणम्मा डाबरगिते, चंद्रकला करंजे, सुनंदा हळ्ळे, पुष्पा द्याडे, छबू द्याडे, अनिता नुत्ते, सुशिला हुडगे, सुनिता डोणगाव, लक्ष्मिबाई स्वामी , महादेवी गौरशेट्टे,विद्यावती कानमंदे, चन्नमा बिरादार, राजेश्री उप्परबावडे,रेवम्मा उप्परबावडे, बालिका कानमंदे,शोभा चपाते, संगीता गौरशेट्टे,रेखा पटणे,मिना कानमंदे आदी उपस्थित होते.





## सर्वरोग निदान शिबिरास उत्सफुर्त सहभाग

उदगीर /प्रतिनिधी- श्री गुरु हावगीस्वी मंदिर सुवर्ण कळसारोहण सोहळ्यानिमित आयोजित सर्व रोगनिदान शिबिरात शिवभक्तानी लाभ घेतला सप्ताहात २१शे महिला पुरुष अबाल वृध्दांनी आरोग्यसेवेचा लाभ घेतला. या मोफत सर्वरोग निदान व उपचार शिबिराचे उदघाटन डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांनी केले. आरोग्य सेवेसाठी डॉ. पुष्कराज बिराजदार ,डॉ . शैलेश मठपती ,डॉ. निरज.ब.बिराजदार ,डॉ. दत्ता पवार ,डॉ. रुपाली बावगे ,डॉ. यशोदिप मोरे ,डॉ. अभय देशपांडे ,डॉ. महेश धुमाळे ,डॉ. निलेश बावगे ,डॉ. विश्र्वनाथ डांगे ,डॉ. स्मृती.ब.स्वामी. ,डॉ. राधीका. वि. बिराजदार ,डॉ. मृत्युजंय वंगे ,डॉ. नेहा.सं.मुसने ,डॉ. व्यंकटेश मलगे ,डॉ. गौतमी बांगे ,डॉ. विजय बिराजदार ,डॉ. संगमेश्र्वर सिध्देश्र्वरे ,डॉ. रामेश्र्वर चोले ,डॉ. जगदीश रावीकर ,डॉ. बस्वराज स्वामी ,डॉ. संदीप मुसने डॉ. गोविंद बरुरे,डॉ. संतोषी मलगे यांनी सेवा केली. मोफत रक्तगट व साखर तपासणी शिबीर.

## डॉ.शंभुलिंग शिवाचार्य महाराजांना पादुका व हस्तलिंग भेट

उदगीर( प्रतिनिधी) श्री गुरु हावगीस्वामी मठाचू मठाधिश डॉ.शंभुलिंग शिवाचार्य महाराजांनास्व:ची पादुका ह्त व हस्तलिंग भक्ताकडून भेट देण्यात आली.

श्री गुरु हावगी स्वामी मठाचे मठाधिश डॉ शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांनी पट्टाभिषेक घेतल्या नंतर त्यांनी मठाचा विकास विकास करुन मठाचे रुपडेच बदलवून टाकले आहे मठाच्या विकासा बरोबर महाराष्ट्र आंध्र तेलंगणा या तीन राज्यात वीरशैव लिंगायत धर्माचा प्रचार व प्रसार करण्याचे मोठे काम करत आहेत . धर्मउपदेशाबरोबरच आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या कुटुबाला आधार देण्याचे काम,समाजातील गरिब व हुशार विद्यार्थ्यांना मदत, विधवा,परितक्त्या महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देणे, गरिब कुटुबाला मोफत विवाह लावून देणे याच बरोबर पर्यावर,जलसंवर्धन व कृषी



क्षैत्रात उत्कृष्ठ कार्य केल्याने कर्नाटक सरकार महाराजांचा सन्मान पत्रदेऊन गौरव केला आहे .

सोलापूर येथील भक्त अश्रि्वणी भंडारे हे लहान बाळा पासुन ते शंभर वर्ष वयाचे वृध्दाचे पाय,हस्त कास्टिगचे माध्यमातून तयारकरण्याचे काम करत आहेत .आपल्या गुरुचेही डॉ. शंभूलिंग शिवाचार्य महाराजांची पादुका ,हस्त व हस्तलिंग श्री गुरु हावगीस्वामी मंदिर येथे असावे या उद्देशाने तयार कास्टिंग पादुका,हस्त व हातात लिंग असलेले हस्तलिंग भेट सद्गुरू हावगीस्वामी मंदिर सुवर्ण कलशारोहण सोहळा निमित्त बिदर रेल्वे गेट जवळील हावगीस्वामी शेतमळा येथील भव्य जागेत अखंड शिवनाम सप्ताह निमित्य विविध कार्यक्रमाचे आयोजन कार्यक्रमात देऊन आशिर्वाद घेतला .